**मे. अंबुजा सिमेंट लिमिटेड, मराठा लाईम स्टोन माईन, पोस्ट-उप्परवाही, तालुका-कोरपना, जिल्हा-चंद्रपूर, महाराष्ट्र येथे ५७९.९० हेक्टर क्षेत्रात चुनखडी उत्खनन १.५ दशलक्ष टन प्रतिवर्ष वरुन ३.५ दशलक्ष टन प्रतिवर्ष (एकूण उत्खनन ६.३९ दशलक्ष टन प्रतिवर्ष) आणि प्रस्तावित १६०० प्रतितास क्रशरच्या उत्पादन क्षमतेच्या प्रकल्पाच्या प्रस्तावाबाबत पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी बाबतचा इतिवृतांत -**

---

| | | |
|---|---|---|
| दिनांक | : | ०३/०५/२०२२ |
| वेळ | : | दुपारी १२:०० वाजता |
| स्थळ | : | प्रकल्प स्थळ, मे. अंबुजा सिमेंट लिमिटेड, मराठा लाईम स्टोन माईन, मौजा थुटरा, तालुका-कोरपना, जिल्हा-चंद्रपूर, महाराष्ट्र |

**प्रस्तावना:-**

मे. अंबुजा सिमेंट लिमिटेड, मराठा लाईम स्टोन माईन, पोस्ट-उप्परवाही, तालुका-कोरपना, जिल्हा-चंद्रपूर, महाराष्ट्र येथे ५७९.९० हेक्टर क्षेत्रात चुनखडी उत्खनन १.५ दशलक्ष टन प्रतिवर्ष वरुन ३.५ दशलक्ष टन प्रतिवर्ष (एकूण उत्खनन ६.३९ दशलक्ष टन प्रतिवर्ष) आणि प्रस्तावित १६०० प्रतितास क्रशरच्या उत्पादन क्षमतेच्या प्रकल्पाच्या प्रस्तावाबाबत पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी जिल्हा-चंद्रपूर, महाराष्ट्र या प्रकल्प उभारणीच्या पर्यावरणविषयक प्रस्तावाबाबत प्रकल्प प्रवर्तकांनी पर्यावरण अनुमती (Environment Clearance) प्राप्त करण्यासाठी आवश्यक असलेला प्रकल्प स्थानाच्या परिघातील १०.० कि.मी. परिघातील पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल (EIA) तयार करण्यासाठी भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांनी टीओआर (TOR) दिनांक १२ मे २०२२ रोजी मान्यता दिलेली आहे.

पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचना, २००६ नुसार प्रकल्प स्थानाच्या १० कि.मी. परिघातील पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालासोबत पर्यावरण जाहिर जनसुनावणी आयोजित करणे व त्यात प्रकल्पग्रस्त, स्थानिक लोक यांनी प्रस्तावित प्रकल्पाविषयी उपस्थित केलेले पर्यावरणीय मुद्दे अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालात समाविष्ट करण्याचे निर्देश दिले. तसेच सदरहू प्रकल्प हा संवर्ग ए-१ (अ) मध्ये मोडत असून पर्यावरण अनुमती ही पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्याकडून प्राप्त करणे आवश्यक आहे.

मे. अंबुजा सिमेंट लिमिटेड, मराठा लाईम स्टोन माईन, पोस्ट-उप्परवाही, तालुका-कोरपना, जिल्हा-चंद्रपूर, महाराष्ट्र यांनी पर्यावरणविषयक जनसुनावणी आयोजित करण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे दिनांक २५/०१/२०२३ अर्ज सादर केला. म.प्र.नि.मंडळ चंद्रपूर व जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांच्या समन्वयाने जिल्हाधिकारी चंद्रपूर, महाराष्ट्र राज्य यांनी दिनांक ०३ मे, २०२३ रोजी दुपारी १२:०० वाजता प्रत्यक्ष (physical) आणि पर्यावरणविषयक जनसुनावणी प्रकल्प

स्थानावर आयोजित करण्यास मान्यता दिली. त्याचप्रमाणे सदरहू जनसुनावणी ऑनलाईन घेण्याचीही सूचना केली.

पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचना, २००६ नुसार पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी बैठकीच्या ३० दिवस अगोदर जाहिर जनसुनावणीची सूचना एक स्थानिक वृत्तपत्रात स्थानिक भाषेत व एक राष्ट्रीय वृत्तपत्रात इंग्रजीमध्ये प्रकाशित करणे बंधनकारक असल्याने उप प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि.मंडळ चंद्रपूर यांनी स्थानिक वृत्तपत्र लोकमत, नागपूर एडिशन यात मराठीत व राष्ट्रीय वृत्तपत्र टाइम्स ऑफ इंडिया, नागपूर यात इंग्रजीत दिनांक ०१/०४/२०२३ रोजी जाहिर सूचना प्रकाशित केलेली होती. त्यात ऑनलाईन जनसुनावणीसाठीचा बैठक नंबर व बैठक पासवर्ड उपलब्ध करण्यात आलेला होता. त्यात नियोजित प्रकल्पामुळे परिसरातील रहिवाशी, पर्यावरणविषयक कार्यरत संस्था, सदर प्रकल्पामुळे विस्थापित होणारे रहिवाशी किंवा सदर प्रकल्पामुळे अन्य प्रकारे प्रभावित होणारे रहिवाशी यांना सदर प्रकल्पाविषयी पर्यावरणविषयक, विचार, टीकाटिप्पणी, सूचना किंवा आक्षेप जाहिरात प्रसिध्द झाल्यापासून जनसुनावणीच्या तारखेपर्यंत स्थानिक चंद्रपूर कार्यालयात लेखी वा ईमेलव्दारे सादर करण्याचे आवाहन करण्यात आलेले होते. त्यानुसार उप प्रादेशिक कार्यालय, चंद्रपूर यांनी एक लेखी आक्षेप प्राप्त झालेला आहे.

या प्रकल्पाबाबत तयार करण्यात आलेला प्रारुप पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल व कार्यकारी सारांश अहवाल इंग्रजी व मराठीत खालील अधिसूचित कार्यालयात नागरिकांच्या अवलोकनार्थ व माहितीसाठी उपलब्ध करुन देण्यात आलेला होता:-

१. पर्यावरण विभाग, १५ वा मजला, नवीन प्रशासकिय भवन, महाराष्ट्र शासन मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
२. सह-संचालक (जल प्रदूषण नियंत्रण), महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्पतरु पाईंट, २ रा व ४ था माळा, सिनेप्लानेट सिनेमा समोर, सायन सर्कल जवळ (पु) मुंबई - ४०० ०२२
३. प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, उद्योग भवन, पहिला माळा, रेल्वे स्टेशन रोड, चंद्रपूर.
४. उप-प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, उद्योग भवन, पहिला माळा, रेल्वे स्टेशन रोड, चंद्रपूर.
५. जिल्हाधिकारी कार्यालय, चंद्रपूर.
६. जिल्हा परिषद, चंद्रपूर.
७. जिल्हा उद्योग केंद्र, चंद्रपूर.
८. उप-विभागीय कार्यालय, राजूरा, ता. राजूरा, जि. चंद्रपूर.
९. उप-विभागीय कार्यालय, कोरपना, ता. कोरपना, जि. चंद्रपूर.
१०. तहसिल कार्यालय, कोरपना, ता. कोरपना, जि. चंद्रपूर.
११. तहसिल कार्यालय, राजुरा, ता. राजुरा, जि. चंद्रपूर.
१२. नगर परिषद कार्यालय, गडचांदूर, ता. कोरपना, जि. चंद्रपूर.

१३. पंचायत समिती कार्यालय, कोरपना, ता. कोरपना, जि. चंद्रपूर.
१४. पंचायत समिती कार्यालय, राजुरा, ता. राजुरा, जि. चंद्रपूर
१५. पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल, कार्यकारी सारांश इंग्रजी व मराठीच्या प्रती प्रकल्पाच्या परिसरातील जवळच्या ग्रामपंचायत कार्यालय जसे की मानोली (खु.), जामणी, ईसापूर, सोनापूर व भेंडवी, ता. राजूरा, जि. चंद्रपूर व ग्रामपंचायत कार्यालय उप्परवाही, कुकडसाट, लखमापूर व थुटरा सोनापूर, ता. कोरपना, जि. चंद्रपूर

वरिल अनुक्रमांक ०६ ते १५ वर नमुद अधिसुचित शासनाच्या विभागांनादेखील त्यांनी त्यांच्या स्तरावर सदरहू पर्यावरणविषयक जनसुनावणीबाबत व्यापक प्रसिध्दी देण्याबाबत कळविण्यात आलेले होते. अशा प्रकारे जाहिर जनसुनावणीबाबत अधिसुचनेमध्ये नमुद केलेल्या पध्दतीचा अवलंब करुन व्यापक स्वरुपात प्रसिध्दी देण्यात आली, जेणेकरुन प्रकल्पबाधित किंवा संबंधित व्यक्तींना त्यांचे विचार, टीकाटिप्पणी, सूचना वा आक्षेप संबंधित विभागास नोंदविणे सोईचे होईल.

पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचनेनुसार सदरहू जनसुनावणी ही प्रकल्पा स्थानावर आयोजित करण्यात आलेली होती.

पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्या दिनांक 14 सप्टेंबर, २००६ च्या पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचनेनुसार सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी कार्यालयीन आदेश ई-३१/२०२२ व्दारा पत्र क्रं. बीओ/जेडी (ड्बल्युपीसी) पीएच/बी-२३०४२६-एफटीएस-००३४ दिनांक २६/०४/२०२३ अन्वये खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती गठित केली:-

| | | |
|---|---|---|
| १) जिल्हादंडाधिकारी, चंद्रपूर<br>किंवा त्यांचे प्रतिनिधी<br>(अपर जिल्हादंडाधिकारी यांच्यापेक्षा<br>कमी दर्जाचा नसावा) | - | **अध्यक्ष** |
| २) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,<br>यांचे प्रतिनिधी - प्रादेशिक अधिकारी,<br>महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, चंद्रपूर | - | **सदस्य** |
| ३) उप प्रादेशिक अधिकारी,<br>महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,<br>चंद्रपूर | - | समन्वयक |

या कार्यालयास उपरोक्त प्रकल्पाबाबत २४ सूचना, तक्रारी, निवेदने, आक्षेप प्राप्त झालेले असून संबंधित व्यक्ती/संस्था यांना जनसुनावणीस उपस्थित राहून त्यांच्या सूचना सूचना, तक्रारी, निवेदने, आक्षेप उपस्थित करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

जनसुनावणी दरम्यान उपस्थितांचे हजेरीपट तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने सदर जाहिर जनसुनावणी घेण्यासाठी गठित केलेल्या समितीचा आदेश सहपत्र-२ प्रमाणे सोबत जोडलेले आहेत.

**<u>जनसुनावणीचे इतिवृत्तः-</u>**

जनसुनावणीच्या सुरवातीस श्री उमाशंकर भादुले, उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ. चंद्रपूर तथा आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी श्री विशालकुमार मेश्राम, अपर जिल्हादंडाधिकारी, चंद्रपूर तथा अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती, श्री अ. मा. करे, प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ. चंद्रपूर तथा सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती, प्रकल्पाचे अधिकारी, पत्रकार, पर्यावरण क्षेत्रातील कार्यरत विविध संस्था व मोठया संख्येने उपस्थित स्थानिक यांचे स्वागत करुन जनसुनावणीच्या कार्यपध्दतीबद्दल माहिती दिली. त्यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी काही पर्यावरणविषयक सूचना, विचार, आक्षेप उपस्थित करण्याचे आवाहन केले. त्यांनी सांगितले की सदरहू जनसुनावणी ही स्थानिक, प्रकल्पग्रस्त यांच्यासाठीच आयोजित करण्यात आलेली असून, जेणेकरून पर्यावरणविषयक प्रश्न, शंका यांचे निरसन होईल.

आयोजक यांनी सांगितले की सदरहू समिती ही उपस्थितांचे प्रस्तावित प्रकल्पाविषयीचे पर्यावरणविषयक शंका, टिकाटिप्पणी, सूचना वा आक्षेप नोंदविण्यासाठी असून सदरहू समितीस प्रकल्पास मंजूरी देणे, नाकारणे वा शिफारस करण्याचा अधिकार नाही. बैठकीत उपस्थितांनी प्रस्तावित प्रकल्पाविषयी पर्यावरणविषयक शंका, टिकाटिप्पणी, सूचना वा आक्षेपांची नोंद घेण्यात येऊन त्याचे इतिवृत्त मराठी व इंग्रजीत तयार करण्यात येऊन ते अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल, प्राप्त झालेल्या लेखी सूचना यांच्यासह अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांच्या संमतीने मुख्यालय, म.प्र.नि.मंडळ ह्याच्या तर्फे पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांना सादर करण्यात येते. तेथील तज्ज्ञ समिती त्याबाबत पुढील निर्णय घेते.

त्यांनी सांगितले की अधिसूचनेतील तरतुदींनुसार सदरहू बैठकीचे छायाचित्रिकरण व व्हिडीओ शुटींग करण्यात येत असून सादरीकरणानंतर उपस्थितांना आपले प्रश्न, सूचना, विचार, आक्षेप शांतपणे मांडावेत. त्यास प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार किंवा प्रकल्प प्रवर्तक उत्तर देतील. प्रश्न विचारताना प्रथम आपले संपूर्ण नांव व गाव सांगण्यात यावे.

आयोजक यांनी अध्यक्षांच्या परवानगीने प्रकल्पाच्या पर्यावरण सल्लागार यांना प्रस्तावित प्रकल्पाचे पर्यावरण व्यवस्थापन योजनेबाबत (Environment Management Plan) सादरीकरण करण्याची सूचना केली.

प्रकल्प अधिकारी यांनी प्रकल्पाचे विस्तारिकरण व पर्यावरण व्यवस्थापन योजनेबाबत (Environment Management Plan) सादरीकरण मराठी भाषेत केले. सादरीकरणात प्रामुख्याने खालील बाबी स्पष्ट करण्यात आल्या:-

- प्रकल्पाबाबतची सविस्तर माहिती
- प्रकल्पाचे क्षेत्रफळ, अक्षांश-रेखांश,नकाशा, बुडित क्षेत्र, लाभक्षेत्र, वन क्षेत्र,प्रकल्पाचे वैशिष्ट्ये,प्रकल्पाचे महत्व, परिणाम, जमीन वापर, भूकंप स्थिरता,
- प्रकल्पाचा उद्देश, सामाजिक स्थिती, रोजगाराची संधी, शेतक-यांच्या प्रकल्पामुळे होणारा विकास,
- प्रकल्पाचे विश्लेषण, सारांश, निष्कर्ष
- सामाजिक व आर्थिक स्थितीचे विश्लेषण
- हवा, पाणी, जमीन, ध्वनी, विस्थापन इ.बाबतची माहिती,
- नियोजित प्रकल्पामुळे हवा,पाणी,विस्थापन,जैवविविधता यावर होणारे परिणाम व व्यवस्थापन
- प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर केले जाणारे पर्यावरण व्यवस्थापन याबाबतची माहिती
- इतर पर्यावरण व्यवस्थापन विषयीची माहिती

आयोजक यांनी उपस्थितांना त्यांचे प्रस्तावित विस्तारिकरण प्रकल्पाविषयी काही विचार, टीकाटिप्पणी, सूचना किंवा आक्षेप असल्यास त्या नोंदविण्याचे आवाहन केले. सदरहू जनसुनावणी ही पर्यावरणविषयक असल्याने पर्यावरणविषयकच प्रश्न उपस्थित करण्याची व सूचना, आक्षेप नोंदविताना प्रथम आपले संपूर्ण नांव व गाव सांगण्याची सूचना केली.

**जनसुनावणी दरम्यान चर्चेतील प्रश्न, टीकाटिप्पणी, आक्षेप, सूचना तसेच प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार/ पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने खालीलप्रमाणे:-**

**१) श्री विक्रम ऐरणे, सभापती, नगर परिषद, गडचांदुर, ता. कोरपना, जि. चंद्रपूर:-**

आजच्या जनसुनावणीत काही मुद्दे उपस्थित करत आहे-

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| १) | प्रकल्पाच्या पर्यावरण सल्लागार यांनी प्रकल्पाविषयी सादरीकरण केलेले आहे. त्यात त्यांनी सांगितले की विस्तारिकरण प्रकल्पात रोजगाराची वाढ होणार आहे. त्याचा फायदा स्थानिक जनतेस होईल. पण आजची परिस्थिती वेगळी आहे. अंबुजा सिमेंट कंपनीने गेल्या एक वर्षाच्या कालावधीत २०० लोकांना व्हीआरएस दिला. प्रस्तावित प्रकल्पात ८२ व्यक्तींना रोजगाराची संधी देण्यात येणार आहे. सादरीकरणात सांगितल्याप्रमाणे त्यात ३५ नविन व उरलेले पदांवर जुन्या व्यक्तींना रोजगार देण्यात येणार आहे. जर २०० लोकांना व्हीआरएस देत असतील, तर या प्रकल्पाचा स्थानिकांना काही फायदा होईल का हा प्रश्न उपस्थित होतो. या प्रकल्पाचा फायदा परिसरातील लोकांना रोजगाराच्या माध्यमातून होणे गरजेचे आहे. | प्रकल्प प्रवर्तक यांनी उत्तर देताना सांगितले की पहिला प्रश्न हा व्हीआरएस चा आहे. व्हीआरएस ही continuous process आहे. बरेच लोक हे स्व-इच्छेने घेत असतात. त्याचप्रमाणे काहींना आरोग्यविषयक अडचणी, प्रश्न असल्यास त्यांनाच व्हीआरएस दिली जाते. |
| २) | त्यावेळी येरणे यांनी सांगितले की फक्त आपल्या कंपनीतच नाही, तर इतर सर्व कंपन्यांमध्ये लोकांना व्हीआरएस घ्यायला लावून त्या पदावर कंत्राटी व्यक्ती फक्त १५,०००/- रुपयांवर कामावर घेतात. बेरोजगार कमी पैशात काम करण्यास तयार होतो. | सूचनेची नोंद घेण्यात आली. |
| ३) | दुसरा मुद्दा प्रकल्पग्रस्तांचा आहे, तो अतिशय महत्वाचा आहे. जरी परिसरातील इतर कंपन्यांपेक्षा अंबुजी कंपनी आघाडीवर असली तरी २००० सालात ज्यांनी जमिनी दिल्या, त्या प्रकल्पग्रस्तांपैकी कित्येक लोकांना अजूनही नौकऱ्या दिलेल्या नाहीत. त्या त्वरित देण्यात याव्यात. ज्यांना नौकऱ्या देण्यात आल्या नाहीत, त्यांना विस्तारिकरण प्रकल्पात समाविष्ट करण्यात यावे. | आपण प्रकल्पग्रस्तांना नोकरी देण्याची सूचना केलेली आहे. आपण त्यात उल्लेख केला की असे नाही की कोणालाच मिळाला नाही. तरी प्रकल्पात नोकरीसाठी प्रकल्पग्रस्तांनाच प्राधान्य दिले जाते. तरीही कोणी प्रकल्पग्रस्त राहिले असल्यास त्यांची यादी कंपनी प्रशासनास देण्यात यावी, आम्ही शक्यतो त्यांना कंपनीत समावेश करण्याचा निश्चितच प्रयत्न करु. |
| ४) | श्री येरणे यांनी येथे आक्षेप नोदविला की आता गेटवर प्रकल्पग्रस्त आंदोलन करत आहेत. कंपनी प्रशासनाजवळ प्रकल्पग्रस्तांची यादी उपलब्ध असणे आवश्यक आहे. त्यात किती लोकांना रोजगार देण्यात आला, किती लोकांना रोजगार | सूचनेची नोंद घेण्यात आली. |

| | | |
|---|---|---|
| | प्रलंबित आहे याची माहिती उपलब्ध असणे गरजेचे आहे. | |
| ५) | त्यांनी आक्षेप नोंदविला की ऑनलाईन डाटामध्ये बदल करुन हवा प्रदूषणाची पातळी ही विहित मर्यादेत आहे असा अहवाल करण्यात येतो. वास्तविक पहाता हवा प्रदूषणात मोठ्या प्रमाणात वाढ झालेली आहे. कंपनीची जी मॉनिटरिंग स्टेशन्स आहेत, ती हवा प्रदूषणाची पातळी दर्शवितात. पण गडचांदुरमध्ये नगरपरिषदेच्या इमारतीवर एक शासकीय डेटा कलेक्शन सेंटर आहे. तो गेले कित्येक दिवस कार्यान्वित नाही. त्यासाठी वारंवार तक्रार केलेली आहे. ते शासकीय डेटा कलेक्शन सेंटर असूनही कार्यान्वित नाही, याची नोंद महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने घ्यावी व ते त्वरित कार्यान्वित करण्यात यावे. | सूचनेची नोंद घेण्यात आली. |
| ६) | पुढील मुद्दा म्हणजे राष्ट्रीय महामार्ग नं. ३५३ जातो, तेथे स्थानिक भाषेत एक ट्रान्सपोर्ट नगर आहे. तेथे प्रकल्प प्रवर्तकांनी कंपनीत येणाऱ्या ट्रक्सची व्यवस्था केलेली आहे. तेथे कंपनीत आलेले अनेक ट्रक्स उभे असतात. त्यामुळे स्थानिकांना जाण्या-येण्यास त्रास होत व अपघात होण्याची जास्त शक्यता आहे. तेथे माजी खासदाराच्या गाडीचाही अपघात झालेला आहे. तरी कंपनीने त्याठिकाणी रस्त्यावर गाड्या उभ्या राहणार नाहीत, यासाठी पर्यायी व्यवस्था करण्यात यावी. विद्यमान खासदारांनीही प्रादेशिक वाहतुक व्यवस्था विभागास याबाबत अवगत केलेले आहे. | आपण पार्किंग बाबत सूचना केलेल्या असून त्या अत्यंत महत्वाच्या आहेत. कंपनी प्रशासनाच्याही लक्षात आलेले आहे की आता हाय वे मुळे तेथे वाहने वेगाने जाणार. त्यासाठी ड्राईंग तयार करण्यात आलेले आहे. ते मंजूर करण्यात आलेले आहे. त्याप्रमाणे कॉंक्रीटीकरण करण्यात येईल. त्याचे काम त्वरित हाती घेण्यात येईल. |
| ७) | त्यावेळी श्री ऐरणे यांनी मत मांडले की कंपनीची पार्किंग जागा चांगली मोठी आहे. मात्र पार्किंगबाबत नियोजन व नियंत्रण आवश्यक आहे. त्याचप्रमाणे जे ट्रक ड्रायव्हर आहेत, त्यांनी नियमांचे उल्लंघन केल्यास त्यांचा करारनामा रद्द करण्यात यावा, तसेच त्यास शिक्षा करण्यात यावी. | प्रकल्प प्रवर्तक यांनी या सूचनेस पाठिंबा दिला. |
| ८) | पुढील मुद्दा म्हणजे प्रस्तावित प्रकल्पापासून १००-२०० मीटर्स अंतरावर मोठा खड्डा आहे. तो कमीतकमी ४-५ हेक्टर्सचा आहे, त्यात पाणी | जवळील खड्डाच्या बाबत आपण सूचना केली. त्यात माणसे पडून जीवित हानी झालेली आहे. आपण तो खड्डा बुजविण्यासाठी काही |

| | | |
|---|---|---|
| | साठलेले असून दहा व्यक्तींना पाण्यात पडून जीव गमवावा लागला आहे. आम्ही तहसीलदारांना निवेदन दिलेले आहे की तो खड्डा बुजविण्यात यावा. मात्र जर कंपनीचे मोठ्या प्रमाणात ओ.बी. निघत असेल, तर कंपनीला खड्डा बुजविणे हा काही फार मोठा प्रश्न नाही. मात्र कंपनी येथे डोळेझाक करत आहे. | मटेरिअल टाकावे असे आपण सूचविले आहे. १५ वर्षे जर तेथील मटेरिअल काढले असेल तर १५ वर्षे परत भरण्यासाठी लागतील. तरी डीजीएमएस च्या सुरक्षितेतच्या निर्देशांनुसार त्यास निर्देशित उंचीचे कुंपण कंपनीने घातले असून अजून एक गोष्ट केली की अंबुजा कंपनीने अजून एक गोष्ट केलेली आहे की रस्त्याच्या बाजूस त्याबाबत सूचना व इमेज लिहिलेली आहे. मात्र येथील उपस्थितांना सांगण्यात येते की घातलेले कुंपण हे तोडण्यात येते, वायर्स कापण्यात येतात. तर स्थानिकांना मदतीचे आवाहन करण्यात येते की आपण गावात जनजागृती करावी व त्या खड्ड्याच्या आत बसणे धोकादायक आहे याबाबत स्थानिकांना मार्गदर्शन करण्यात यावे. त्यावर लक्ष ठेवण्याचे काम कंपनी प्रशासन करेल. |
| ९) | श्री येरणे यांनी कंपनी अधिका-यांना विचारणा केली आपणकडे भरपूर ओ.बी. आहे. जर तो खड्डा कंपनीच्या कामाचा नाही, तर ओ.बी. ख़ड्डा भरण्यासाठी वापर करावा. कंपनीने जरी एक गार्ड नेमला, तरी तो पाच-सात हेक्टर सांभाळू शकणार नाही. तसेच जीवीत हानी होणार नाही यांची काळजी कंपनीने घ्यावी व जीवीत हानी झाल्यास कंपनीच्या विरुध्द गुन्हा नोंदविण्यात येईल. तो खड्डा बुजविणे हाच एक पर्याय आहे. प्रकल्प प्रवर्तक यांनी याबाबत सर्वाच्या हितासाठी निर्णय घेण्यात येईल. | सूचनेची नोंद घेण्यात आली. |
| १०) | पुढील मुद्दा म्हणजे गडचांदूर हे गाव प्रकल्पाच्या बाधित क्षेत्रात आहे. येथे अंबुजा फाऊन्डेशनचे सीएसआर निधीतून सामाजिक काम खूपच चांगले आहे. मात्र गडचांदुर गावाला दुर्लक्षित केले असे आम्हांला वाटते. तरी कंपनी प्रशासनाने गडचांदुर गावासाठी सीएसआर निधीतून सामाजिक कामे करावीत. | प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की गडचांदुरसाठी सीएसआरनिधी खर्च करण्याबाबत मागणी करण्यात आली. तरी श्री ऐरणे यांच्याशी ४-५ दिवसांना त्याबाबत चर्चा करुन जेथे काही बाबींमध्य त्रुटी, कमतरता राहिली असल्यास त्या पूर्ण करण्यात येतील. |
| ११) | त्याचप्रमाणे पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालातील टेबल क्रमांक ३.२१ नुसार या | सूचनेची नोंद घेण्यात आली. |

| | | |
|---|---|---|
| | क्षेत्रात जे वन्यजीव आढळून आले, तर वनखात्याचा रेकॉर्ड पाहिले तर जेथे ही जनसुनावणी होते, त्याच्या मागच्या बाजूस बिबट्याच्या अधिवासाची चिन्हे दिसून आलेली आहेत. त्याचा कुठेही उल्लेख पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालात नाही. याची नोंद घेण्यात यावी. ईआयए अहवालात आपण ३.२ टेबल्सचा उल्लेख केला. यात चित्याचा उल्लेख आपण केलेला आहे. मात्र कंपनीकडे जो अहवाल आहेत, त्यामध्ये कुठल्याही वन्यप्राणी, संरक्षित प्राणी यांचा उल्लेख नाही. | |
| १२) | श्री येरणे यानी आक्षेप नोंदविला की वनखात्याच्या अहवालानुसार कंपनीच्या मागील गावात बिबट्याचा अधिवास असण्याचे पुरावे मिळालेले आहेत. गडचांदुरमध्येही तसे पुरावे मिळालेले आहेत. | प्रकल्प अधिकारी यांनी याबाबत परत अभ्यास व पुरावे तपासण्याचे आश्वासन दिले. |
| १३) | प्रकल्पासाठी लागणारे पाणी हे<br>पगडीगुडडम धरणातून घेण्यात येणार आहे. - मात्र येथून जवळ असणा-या ईसापूर गावात कंपनी एक खाजगी धरण बांधू शकते. जर ईसापूर गावात धरण बांधले तर त्याचा फायदा कंपनीस व गावालाही होईल. जर प्रकल्पासाठी खाजगी धरण बांधण्याचे नियोजन केल्यास शेतक-यांचे पाणी जे कंपनी वापरत आहे, ते शेतकऱ्यांना मिळेल व कंपनीविषयी जो रोष आहे, तो कमी होईल. | प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की आपण ईसापूर येथे लहान धरण बांधण्याची सूचना केलेली आहे. याबाबत कंपनी प्रशासन ईसापूरला भेट देईल व त्याबाबत सर्व गोष्टींचा अभ्यास करण्यात येईल. लोकांना फायदा होणार असल्यास त्याबाबत निश्चितच सकारात्मक विचार करण्यात येईल. |
| १४) | या संपूर्ण ईआय़एमध्ये राष्ट्रीय महामार्ग गोवंदपूर ते राजुरा, त्याचे काम सुरु आहे. त्याचा कुठेही उल्लेख नाही. आणि याच राष्ट्रीय महामार्गाला हरदोना गावाजवळ अंबुजा सिमेंटची रेल्वे क्रॉसिंग आहे. नॅशनल हायवे ने ओव्हर क्रॉसिंग करण्यासाठी अंबुजा सिमेंटला पत्रव्यवहार केला असताना अंबुजाने आमच्या खूपच कमी रेल्वे गाड्या जातात असे कळवून ओव्हर क्रॉसिंग करण्याचे टाळले. तरी आमची मागणी आहे की पिलर्स स्ट्रक्चरचा रेल्वे ओव्हरब्रीज बनविण्यात यावा. | प्रकल्प प्रवर्तकांनी उत्तर दिले की कंपनी पुन्हा याचा अभ्यास करेल. वाहतुकीचा प्रश्न आहे. तर आम्ही परत नॅशनल हाय वे एथॉरिटी प्रशासनाशी चर्चा करुन पुढील कार्यवाही करण्यात येईल. याचा उल्लेख Final EIA रीपोर्ट मध्ये करण्यात येईल. |

| | | |
|---|---|---|
| १५) | श्री येरणे यांनी सागितले की ते नॅशनल हाय वे एथॉरिटी कार्यालयात गेले होते. त्यावेळी तेथील प्रशासनाने सांगितले की जेथे जेथे रेल्वे क्रॉस होते, तेथे तेथे अंबुजा सिमेंटने आरओबी बनवावे असे नॅशनल हाय वे एथॉरिटीने सांगितले आहे. त्यांनी सांगितले की कंपनीस त्याचा निम्मा खर्च करावा लागतो, त्यामुळे कंपनी आमच्या गाड्या कमी जातात असे सांगतात. चंद्रपूरला जाणाऱ्या लोकांना २-३ वेळा रेल्वे बंद राहते. जर आठ हजार कोटी रुपयांचा प्रकल्प आपला आहे, तर लोकांच्या हितासाठी अंबुजाने खर्च केल्यास कंपनीला फारसा बोजा पडणार नाही. | सूचनेची नोंद घेण्यात आली. |
| १६) | या ईआयए अहवालात तापमान वाढीबाबत अभ्यास करण्यात आलेला नाही. ईआयए अहवालात पान नं. ७३ वर परिसरातील सर्वात जास्त तापमान हे ४२.८° से. असे दाखविलेले आहे. सर्वांनाच माहित आहे की मे महिन्यात येथे ४८° से. पर्यंत तापमान जात असते. जर चुकीची माहिती ईआयए अहवालात देत असतील, तर ईआयए अहवालाच्या वैधतेवरच आम्ही प्रश्न उपस्थित करतो. | आपण तापमान वाढीचा उल्लेख केलेला आहे. अहवालात ४२° से. लिहिले असले तर येथे ४८° से असते. तर क्रॉलनीत हरितपट्टा असल्याने तेथील तापमान हे कमी असते. तर जे होते, ते त्यांनी मांडले आहे. याची नोंद Final EIA रीपोर्ट मध्ये घेण्यात येईल. |
| १७) | श्री येरणे यांनी सांगितले की परिसरातील वरिष्ठ नागरिक सांगतात की प्रकल्प नव्हता, तेव्हा येथे एवढे तापमान नव्हते. आपल्या कार्यकारी सारांश अहवालात त्याचा उल्लेख नाही, तर पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालात पान नं. ७३ वर तापमानाबाबत फक्त एकच लाईन आहे. तेथे तापमान हे चुकीचे सांगण्यात आलेले आहे. जर आपण तापमान वाढीबाबत उल्लेख केल्यास भारत सरकार याबाबत आपणास काही उपाययोजना सांगतील. त्यांनी सूचना केली की महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने तापमानाबाबत काही सूचना कराव्यात. | सूचनेची नोंद घेण्यात आली. |
| १८) | परिसरातील काही लोकांची शेती ही माईन्समध्ये अडकली (lock) आहे. चारी बाजूस माईन्स आणि मध्ये शेती आहे. माझ्याकडे प्रशांत | प्रकल्प अधिकारी यांनी सांगितले की बरेच ठिकाणी शेताच्या चारी बाजूस किंवा दोन्ही बाजूस जागा सोडल्या जातात. प्रकल्प क्षेत्रामुळे |

| | | |
|---|---|---|
| | क्षेत्रात जे वन्यजीव आढळून आले, तर वनखात्याचा रेकॉर्ड पाहिले तर जेथे ही जनसुनावणी होते, त्याच्या मागच्या बाजूस बिबट्याच्या अधिवासाची चिन्हे दिसून आलेली आहेत. त्याचा कुठेही उल्लेख पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालात नाही. याची नोंद घेण्यात यावी. ईआयए अहवालात आपण ३.२ टेबल्सचा उल्लेख केला. यात चित्याचा उल्लेख आपण केलेला आहे. मात्र कंपनीकडे जो अहवाल आहेत, त्यामध्ये कुठल्याही वन्यप्राणी, संरक्षित प्राणी यांचा उल्लेख नाही. | |
| १२) | श्री येरणे यानी आक्षेप नोंदविला की वनखात्याच्या अहवालानुसार कंपनीच्या मागील गावात बिबट्याचा अधिवास असण्याचे पुरावे मिळालेले आहेत. गडचांदुरमध्येही तसे पुरावे मिळालेले आहेत. | प्रकल्प अधिकारी यांनी याबाबत परत अभ्यास व पुरावे तपासण्याचे आश्वासन दिले. |
| १३) | प्रकल्पासाठी लागणारे पाणी हे पगडीगुडडम धरणातून घेण्यात येणार आहे. - मात्र येथून जवळ असणा-या ईसापूर गावात कंपनी एक खाजगी धरण बांधू शकते. जर ईसापूर गावात धरण बांधले तर त्याचा फायदा कंपनीस व गावालाही होईल. जर प्रकल्पासाठी खाजगी धरण बांधण्याचे नियोजन केल्यास शेतक-यांचे पाणी जे कंपनी वापरत आहे, ते शेतकऱ्यांना मिळेल व कंपनीविषयी जो रोष आहे, तो कमी होईल. | प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की आपण ईसापूर येथे लहान धरण बांधण्याची सूचना केलेली आहे. याबाबत कंपनी प्रशासन ईसापूरला भेट देईल व त्याबाबत सर्व गोष्टींचा अभ्यास करण्यात येईल. लोकांना फायदा होणार असल्यास त्याबाबत निश्चितच सकारात्मक विचार करण्यात येईल. |
| १४) | या संपूर्ण ईआय़एमध्ये राष्ट्रीय महामार्ग गोवंदपूर ते राजुरा, त्याचे काम सुरु आहे. त्याचा कुठेही उल्लेख नाही. आणि याच राष्ट्रीय महामार्गाला हरदोना गावाजवळ अंबुजा सिमेंटची रेल्वे क्रॉसिंग आहे. नॅशनल हायवे ने ओव्हर क्रॉसिंग करण्यासाठी अंबुजा सिमेंटला पत्रव्यवहार केला असताना अंबुजाने आमच्या खूपच कमी रेल्वे गाड्या जातात असे कळवून ओव्हर क्रॉसिंग करण्याचे टाळले. तरी आमची मागणी आहे की पिलर्स स्ट्रक्चरचा रेल्वे ओव्हरब्रीज बनविण्यात यावा. | प्रकल्प प्रवर्तकांनी उत्तर दिले की कंपनी पुन्हा याचा अभ्यास करेल. वाहतुकीचा प्रश्न आहे. तर आम्ही परत नॅशनल हाय वे एथॉरिटी प्रशासनाशी चर्चा करुन पुढील कार्यवाही करण्यात येईल. याचा उल्लेख Final EIA रीपोर्ट मध्ये करण्यात येईल. |

| | | |
|---|---|---|
| १५) | श्री येरणे यांनी सागितले की ते नॅशनल हाय वे एथ्ॉरिटी कार्यालयात गेले होते. त्यावेळी तेथील प्रशासनाने सांगितले की जेथे जेथे रेल्वे क्रॉस होते, तेथे तेथे अंबुजा सिमेंटने आरओबी बनवावे असे नॅशनल हाय वे एथ्ॉरिटीने सांगितले आहे. त्यांनी सांगितले की कंपनीस त्याचा निम्मा खर्च करावा लागतो, त्यामुळे कंपनी आमच्या गाड्या कमी जातात असे सांगतात. चंद्रपूरला जाणाऱ्या लोकांना २-३ वेळा रेल्वे बंद राहते. जर आठ हजार कोटी रुपयांचा प्रकल्प आपला आहे, तर लोकांच्या हितासाठी अंबुजाने खर्च केल्यास कंपनीला फारसा बोजा पडणार नाही. | सूचनेची नोंद घेण्यात आली. |
| १६) | या ईआयए अहवालात तापमान वाढीबाबत अभ्यास करण्यात आलेला नाही. ईआयए अहवालात पान नं. ७३ वर परिसरातील सर्वात जास्त तापमान हे ४२.८° से. असे दाखविलेले आहे. सर्वांनाच माहित आहे की मे महिन्यात येथे ४८° से. पर्यंत तापमान जात असते. जर चुकीची माहिती ईआयए अहवालात देत असतील, तर ईआयए अहवालाच्या वैधतेवरच आम्ही प्रश्न उपस्थित करतो. | आपण तापमान वाढीचा उल्लेख केलेला आहे. अहवालात ४२° से. लिहिले असले तर येथे ४८° से असते. तर क़ॉलनीत हरितपट्टा असल्याने तेथील तापमान हे कमी असते. तर जे होते, ते त्यांनी मांडले आहे. याची नोंद Final EIA रीपोर्ट मध्ये घेण्यात येईल. |
| १७) | श्री येरणे यांनी सांगितले की परिसरातील वरिष्ठ नागरिक सांगतात की प्रकल्प नव्हता, तेव्हा येथे एवढे तापमान नव्हते. आपल्या कार्यकारी सारांश अहवालात त्याचा उल्लेख नाही, तर पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालात पान नं. ७३ वर तापमानाबाबत फक्त एकच लाईन आहे. तेथे तापमान हे चुकीचे सांगण्यात आलेले आहे. जर आपण तापमान वाढीबाबत उल्लेख केल्यास भारत सरकार याबाबत आपणास काही उपाययोजना सांगतील. त्यांनी सूचना केली की महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने तापमानाबाबत काही सूचना कराव्यात. | सूचनेची नोंद घेण्यात आली. |
| १८) | परिसरातील काही लोकांची शेती ही माईन्समध्ये अडकली (lock) आहे. चारी बाजूस माईन्स आणि मध्ये शेती आहे. माझ्याकडे प्रशांत | प्रकल्प अधिकारी यांनी सांगितले की बरेच ठिकाणी शेताच्या चारी बाजूस किंवा दोन्ही बाजूस जागा सोडल्या जातात. प्रकल्प क्षेत्रामुळे |

| | | |
|---|---|---|
| | विठ्ठलराव झाडे आणि प्रविण विठ्ठलराव झाडे यांचे. त्यांचे सर्व्हे नं. २२५/१ व २२५/२, थुटरा. त्यांची शेती खाणी परिसरात अडकली (lock) आहे. त्यांना शेतावर जाण्यासही रस्ता नाही. अशा बाधित शेतकऱ्यांना शेतावर जाण्याची व्यवस्था कंपनीने करुन द्यावी. | त्यांना शेतावर जाणे शक्य होत नाही. आपण सर्व्हे नंबर दिलेले आहेत. तर त्याबाबत निर्णय घेण्यात येईल. कंपनीचे प्रतिनिधी याबाबत त्यांच्याशी चर्चा करतील. जर तो भूखंड विकत घेऊन प्रश्न सुटत असतील, तर त्याबाबत सहकार्याने प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करण्यात येईल. |
| १९) | गावातील सामान्य लोकांना ऑनलाईन मॉनिटरिंग सयंत्रणेशी संपर्कात राहता येईल काय? त्या स्टेशनचा जनतेला संपर्क (access) होणे आवश्यक आहे. तेव्हाच जनतेचा आपल्या ऑनलाईन मॉनिटरिंग सयंत्रणेवर विश्वास वाढेल. | प्रकल्पाचे प्रवर्तक संचालक यांनी सांगितले की ही सूचना निश्चित चांगली आहे. भविष्यात जर तसा नियम आल्यास आम्ही ती निश्चितच अंमलात आणू. |
| २०) | २००१ ली ही कंपनी आली, तेव्हा गडचांदुर हे छोटेसे गाव होते. नंतर या परिसरात २-३ कंपन्या आल्या. अंबुजा कंपनीने रस्त्याजवळील पूर्ण जागा माईन्सच्या नावाने अधिग्रहित केल्या. त्यासाठी कंपनीने काहींना पैसे दिले,काहींना दिली नाही. तर ही १२ गावे व लहान ५० गावे या सर्वांचे मुख्य ठिकाण आहे गडचांदुर. आता शासनाकडे जागा उपलब्ध नाही की तेथे बस स्टॅण्ड बांधता येईल. २०११-१२ च्या दरम्यान जिल्हाधिकारी, लोकप्रतिनिधी यांच्यासमोर अंबुजा सिमेंटने मान्य केले की दोन एकर जागा ही बस स्टॅण्डसाठी उपलब्ध करण्यात येईल. कंपनीने जागा घेतली ती माईन्सच्या नावाने. रस्त्यालगत २०० मीटर्स कंपनी माईन्स करु शकत नाही. तर आजपावेतो एसएसआरडीसीला दोन एकरचा भूखंड हस्तांतरित झालेला नाही. त्यामूळे संपूर्ण महाराष्ट्रात कोरपना असा तालुका आहे की येथे बस स्टॅण्ड नाही. त्याचे कारण अंबुजाने रस्त्यालगतची पूर्ण जागा घेऊन ठेवली. तरी कंपनी व्यवस्थापनास विनंती आहे की भूखंड हस्तातरणाचा प्रस्ताव हा पुढील १-२ महिन्यात सोडवावा. कंपनीने ते मान्य करावे. | सूचनेची नोंद घेण्यात आली. |

येथे आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना आवाहन केले की सदरहू जनसुनावणी ही प्रस्तावित प्रकल्पाची पर्यावरणविषयक असल्याने फक्त पर्यावरणविषयच मुद्दे उपस्थित करण्यात यावे.

२) **<u>श्री चंद्रकांत सुरेश झाडे, राहणार-एक प्रकल्पग्रस्तः-</u>**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | प्रकल्पामुळे पर्यावरणावर जो आघाताचा अभ्यास करण्यात येतो, त्याचप्रमाणे प्रकल्पामुळे जो सामाजिक आघात होतो, त्याचाही विचार करण्यात यावा. त्यासाठीसुध्दा वेगळी जनसुनावणी घेण्यात आली पाहिजे. | प्रकल्प अधिकारी यांनी सांगितले की आपण पहिला प्रश्न होता पर्यावरण अहवालासोबत सामजिक परिणामांचाही अभ्यास होणे गरजेचे आहे. याबाबत आम्ही जिल्हा प्रशासनाबरोबरच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाशी चर्चा करण्यात येईल व शासनाचे निर्देश पाळण्यात येतील. |
| २) | आमचे गाव आहे अर्दाखुर्द. ब्लास्टींगचे धक्के आमच्या गावाला जाणवतात. सकाळी उठल्यावर पाहिले तर घरात धुळ जमा झालेली असते. | आपण ब्लास्टींगचा मुद्दा उपस्थित केला. प्रकल्प अधिकारी यांनी श्री झाडे यांना उत्तर देताना सांगितले की आम्ही कंट्रोल ब्लास्टींग करत असतो. आम्ही त्याचा वेळोवेळी अभ्यास करत असतो. आम्ही २०१९ मध्ये अभ्यास केलेला होता. आता यावर्षी करणार आहोत. जे दूरच्या गावात व्हायब्रेशन जाते, तर आम्ही प्रत्येक ब्लास्टींगचा सिसमोग्राफने रिडिंग घेत असतो. आम्हांला जी मर्यादा/लिमिट दिलेले आहे, ते पाळण्यात येते, ब्लास्टींगची पातळी ही २.५-३.० अशीच पाळण्यात येणार आहे. प्रकल्पाचे कार्यकारी संचालक यांनी सांगितले की परत एकदा मशीन लाऊन ब्लास्टींगची पातळी ही मोजण्यात येईल. मात्र आपणास जर त्रास होत असेल, तर त्याचाही अभ्यास करण्यात येईल. |
| ३) | त्यांनी पुढे सांगितले की माझ्याकडे १०५ प्रकल्पग्रस्त व्यक्तींची यादी आहे. मी ४५ दिवस उपोषण केले. एकदा माईन्सचा ताबा घेतला. नंतर शासनाने एक सदस्य चौकशी स्थापन केली. चौकशी समितीने कंपनीचा करार रद्द करण्याची | सूचनेची नोंद घेण्यात आली. |

| | | |
|---|---|---|
| | शिफारस शासनास केलेली आहे. कराराच्या कलम ८ नुसार कंपनीने वेळोवेळी किती प्रकल्पग्रस्तांना नौकऱ्या दिल्या ही माहिती कळविली नाही. शासनस्तरावर कंपनीचा करार रद्द करण्याची कार्यवाही चालू आहे. तर कंपनीने मला याबाबत स्पष्टीकरण द्यावे. कंपनीने आतापर्यंत किती प्रकल्पग्रस्तांना नौकऱ्या दिल्या, कोणत्या संवर्गात दिल्या याबाबत डेटा अजूनपर्यंत जिल्हाधिकारी कार्यालयात दिलेला नाही, मंत्रालयात-शासनासही दिलेला नाही. हे संविधानाचे उल्लंघन आहे. जर कायद्याची अंमलबजावणी सर्वांना सारखी आहे, तर मग या कंपनीला का नाही? तर या कंपनीवर का कारवाई झालेली नाही? | |
| ४) | तरी जसा पर्यावरण अहवाल बनविला जातो, तसाच सामाजिक आघात अहवाल बनविण्यात यावा. त्यावरही जनसुनावणी झाली पाहिजे. कंपनीच्या वेस्ट/कच-याच्या गाडया गावातून जातात. त्याचा वास आम्हांला सहन करावा लागतो. गडचांदुर राजुरा महामार्ग रस्त्यावर कंपनीचे पार्किंग करतात. त्यामुळे तेथे अपघात होतात. कंपनीचे कार्बन उत्सर्जन जास्त प्रमाणात होते. | प्रकल्प अधिकारी यांनी सांगितले की आपण पार्किंगचा मुद्दा उपस्थित केलेला आहे. तो आम्हांलाही त्रासदायक होतो. त्याबाबत चुकीचे पार्किंग केल्यास टॅकरवाल्यास दंड आकारण्याचा प्रस्ताव निश्चितच चांगला असून त्याबाबत संबंधित विभागाशी चर्चा करण्यात येईल. |
| ५) | श्री चंद्रकांत झाडे यांनी आक्षेप नोंदविला की कंपनीने पाठविलेला डेटा हा चुकीचा आहे. श्री झाडे यांनी सांगितले की आम्ही एक होऊन आंदोलन केले, त्यामुळे शासनाने एक चौकशी समिती गठित केली. चौकशी समितीने अहवाल दिला की संबंधित कंपनीने नियमांचे भंग केलेला आहे. तरी त्या कंपनीचा करार रद्द झाला पाहिजे. | प्रकल्प अधिकारी यांनी सांगितले की जिल्हा प्रशासनाने मागितलेले सर्व डेटा आम्ही दोनवेळेस दिलेला आहे |
| ६) | यादीमध्ये प्रकल्पग्रस्त असल्यास त्याचा सर्व्हे नंबर, स्थानिक असल्यास गावाचे नाव, तहसीलचे नाव, जिल्ह्याचे नाव हे देण्यात आलेले नाही. | प्रकल्प अधिकारी यांनी सांगितले की जिल्हाधिकारी कार्यालयाने जशी माहिती मागितली,तशी ती वेळोवेळी जिल्हाधिकारी कार्यालयास सादर करण्यात आलेली आहे व भविष्यातही सादर करण्यात येईल. |

| | | |
|---|---|---|
| ७) | वायूचे उत्सर्जन होते, त्याचा डेटा हा ऑनलाईन स्थानिकांना दिसला पाहिजे. कंपनीतून किती कार्बनचे उत्सर्जन होते, ते स्थानिकांना कळले पाहिजे. | प्रकल्प अधिकारी यांनी सांगितले की ऑनलाईन डिसप्ले हा नियमाप्रमाणे होत असून तो गेटला लावलेला आहे. भारत सरकारचे नियम हे आम्हांला पाळावेच लागतात. |
| ८) | जनसुनावणीची सूचना १ एप्रिलला स्थानिक वृत्तपत्रात-लोकमत येथे प्रकाशित झालेली होती. त्यात लिहिलेले आहे की उपरोक्त प्रकल्पाविषयी पर्यावरणविषयक सूचना, आक्षेप, टीकाटिप्पणी ही ३० दिवसात स्थानिक म.प्र.नि.मंडळ कार्यालयात सादर करण्यात यावी. मात्र आपण प्रस्तवित प्रकल्पाचा पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल, कार्यकारी सारांश अहवाल ही स्थानिक ग्रामपंचायतीस दिनांक १३/०४/२०२३ रोजी दिलेला आहे. म्हणेज पेपरात १ एप्रिलला दिले, मात्र ग्रामपंचायतीस दिले १३ एप्रिलला, म्हणजे आम्हांला जवळजवळ १५ दिवस उशिरा अहवाल उपलब्ध केला | सूचनेची नोंद घेण्यात आली |
| ९) | त्यांनी पुढे सांगितले की कंपनीने चागले केले की कंपनी वेस्ट रिकव्हरी प्लँट आणत आहे. तो ४५ मेगावॅटचा आहे. खूप छान काम आहे. तर या ४५ मेगावॅटच्या प्रकल्पात किती मनुष्यबळाची आवश्यकता आहे?<br>त्यांनी आक्षेप नोंदविला की ३०/१०/२०२२ ला ना हरकत प्रमाणपत्राची मुदत संपली असताना आजतोपावतो प्रकल्प कसा सुरु आहे?<br>आपण दिलेल्या माहितीनुसार मनुष्यबळाची आवश्यकता १४०० व्यक्ती आहे. त्यात नियमित – ५०, कंत्राटी- १५० – एकूण २००.०<br>कंपनीने कराराचे उल्लंघन केल्याने शासन स्तरावर कंपनीचा करार रद्द करण्याची पुढील प्रक्रिया चालू आहे. तरी याबाबत खुलास करण्यात यावा.<br>प्रकल्प अधिकारी यांनी सांगितले की सदरहू बाब ही उद्याच्या बैठकीची असल्याने त्याचे उत्तर उद्या देणयात येईल. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की ही बाब खदानीशी संबंधित नाही. |

| | | |
|---|---|---|
| | त्यांनी पुढे सांगितले की जसे पर्यावरण दायित्व विचारात घेण्यात येते, त्याचप्रमाणे सामाजिक दायित्वही विचारात घ्यावे. | |
| १०) | आपल्या कंपनीचा फायदा हा समाजातील सर्व घटकांना मिळणे आवश्यक आहे. मात्र अंबुजाचही वैद्यकीय सेवा ही योग्य नाही. आपली जी व्हॅन येते, जी वैद्यकीय सुविधा पुरविण्यात येते, ती योग्य नाही. ती बारा गावातील बाहेरील गावांनाही मिळणे आवश्यक आहे. आपल्या हॉस्पिटलमध्ये आपला कर्मचारीसुध्दा उपचार घेत नाही. तर तेथे सर्व सुविधा पुरविण्यात याव्यात. त्यांनी सांगितले की त्यांना अंबुजामध्ये नोकरी मिळाली नाही. याचे उत्तर देणे अपेक्षित आहे. माझी नऊ एकर जमिन हाय वेच्या बाजूस होती. काळीभोर माती होती. ती अंबुजाने घेतली. माझी जमिन घेतली, पण मला रोजगारही मिळाला नाही. आपले दायित्व आहे की ज्याची जमिन घेतली, त्यास रोजगाराची संधी दिली पाहिजे. तर मला नोकरी कधी मिळणार? संविधानाच्या नियमाप्रमाणे कंपनीने काम करणे गरजेचे आहे. तरी जनमानसाचा विचार करावा. आपला प्रकल्प हा त्यांच्यामुळे चालतो. किसान जमिन देतो म्हणून आपला प्रकल्प उभा राहतो. आपणास पैसे मिळतात. तरी प्रकल्पग्रस्तांचा हक्क डावलला जाऊ नये. त्याचप्रमाणे ही जनसुनावणी आहे. गावातील सर्वजण पेपर वाचत नाही. आपण उशिरा पर्यावरण अहवाल आमच्या गावाच्या ग्रामपंचायतीस पाठविला. त्यांनी मप्रनि मंडळाच्या अनुमतीबाबत स्पष्टीकरण विचारले. जर वैधता संपली आहे तर प्रकल्प कसा चालू आहे? प्रकल्प अधिकारी यांनी सांगितले की शेवटी कंपनी आहे म्हणून सामाजिक दायित्व आहे. तरी कंपनी व त्याचे सामाजिक दायित्व हे वेगळे करण्यात येऊ नये.<br>श्री झाडे यांनी सांगितले की कंपनीने आदिवासींना भूमीहिन केले. कायद्याप्रमाणे आदिवासींना भूमीहिन करता येत नाही. जर त्याची जमिन | सूचनेची नोंद घेण्यात आली.<br>प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की ही कंपनी सामाजिक जबाबदारी आहे व या बाबी वेगळया नाहीत. |

| | | |
|---|---|---|
| | घेतली, तर त्यास रोजगार हा दिलाच पाहिजे. सर्व प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन हे झालेच पाहिजे. त्यांनी पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समितीस त्यांच्या न्याय मागण्या मंजूर करण्याची कंपनीस सूचना करण्याची विनंती केली. | |

श्री झाडे यांनी अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांना विचारणा केली की गडचांदुरला ऑनलाईन डिसप्लेसाठी यंत्र लावलेले आहे. ते जर कार्यान्वित नसेल, तर ते त्वरित कार्यान्वित करण्यात यावे.

## ३) <u>श्री प्रविण मटाले, राहणार-राजुरा, ता. राजुरा, जि. चंद्रपूर:-</u>

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | कंपनी प्रशासन जे सांगते, ते काहीही करत नाही. त्याचप्रमाणे शासन जे नियम पाळण्यास सांगते, कंपनी त्याची अंमलबजावणी करत नाही. आम्ही प्रकल्पग्रस्त आहोत. श्री प्रदीप देशमुख यांच्याबरोबर आम्ही ४७ दिवस आंदोलन केले. नंतर शासनाने चौकशी समिती गठीत केली. त्यांनी सांगितले की कंपनी व शासन यांच्यात करार आहे की जिल्हा प्रशासन जी काही माहिती मागेल, ती कंपनीस देणे बंधनकारक आहे. मात्र कंपनीच्या त्यावेळच्या व्यवस्थापनाने सर्व नियमांचे उल्लंघन केले. त्याचप्रमाणे आता बैठकीत सांगण्यात आले की सर्व प्रकल्पग्रस्तांना नौकऱ्या देण्यात आल्यात. मात्र कंपनीने वेळोवेळी चुकीची माहिती शासनास सादर केली. माझा प्रश्न आहे की कंपनीने उत्तर दिले की एकही प्रकल्पग्रस्त हा रोजगाराच्या संधीपासून वंचित नाही. तर कंपनी येथे पुर्णपणे चुकीची माहिती देत आहे. येथील परिसरात मुख्यत्वे आदिवासी समाज आहे. ते लहानशा झोपडीत राहतात. त्यांची मुले कामाशिवाय फिरत आहेत. इंग्रजांनी जेवढा अन्याय केला नाही, त्यापेक्षा जास्त अंबुजा कंपनी ही त्या आदिवासी समाजावर करत आहे. आदिवासी समाजाच्या | प्रकल्प प्रवर्तकांनी यांनी सांगितले की कंपनी कोणावरही जाणुनबुजून अन्याय करत नाही. कंपनी प्रशासनाकडे प्रकल्पग्रस्तांची जी यादी आहे, त्याप्रमाणे आम्ही रोजगाराची संधी दिलेली आहे. त्याचप्रमाणे कंपनीजवळील माहितीमध्ये काही त्रुटी असल्यास ती त्वरित दुरुस्त करण्यात येऊन प्रकल्पग्रस्तांना न्याय देण्यात येईल. प्रकल्पग्रस्त नसताना त्यांना पैसे देऊन नौकऱ्या दिल्या याबाबत कंपनी व्यवस्थापनाला काहीही माहिती नाही. कंपनीकडून अशा गोष्टींवर लक्ष ठेवण्यात येईल. |

| | | |
|---|---|---|
| | जमिनीवर बाहेरील हजारो लोकांना नौकऱ्या मिळाल्या. पण आदिवासी समाज हा परागंदा झालेला आहे. मी गेले दहा वर्षे कंपनी व्यवस्थापनाबरोबर अन्यायाविरुध्द लढत आहे. ज्यांची जमिन गेली नाही, त्यांना नौकऱ्या मिळाल्या. आमचा आरोप आहे की कंपनीच्या प्रशासनाने पैसे घेऊन काही लोकांना नौकऱ्या दिलेल्या आहेत. पण ज्यांच्या जमिनी गेल्या, त्या प्रकल्पग्रस्तांना नौकऱ्या मिळालेल्या नाहीत. तरी कंपनीने शासनाने पारित केलेले सर्व नियम पाळावेत आणि माणुसकीच्या भावनेने प्रकल्पग्रस्तांना न्याय द्यावा. | |
| २) | श्री प्रविण मटाले यांनी सूचना केली की आमची प्रतिनिधी समिती आहे. कंपनीने प्रतिनिधी समिती व जिल्हाधिकारी यांची बैठक त्वरित लावण्यात यावी. | कंपनी प्रशासनाने त्याबाबत आश्वासन दिले. |

४) <u>**श्री राजेश बेले, संस्थापक अध्यक्ष, संजीवनी सामाजीक पर्यावरण संस्था, चंद्रपूरः-**</u>

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | ही जनसुनावणी ही पर्यावरणाविषयक आहे. तर पर्यावरणाशी निगडीत वन सुध्दा आहे. तरी या बैठकीस वनविभागाचे अधिकारी उपस्थित असणे आवश्यक आहे | सूचनेची नोंद घेण्यात आली. |
| २) | अंबुजा सिमेंट प्रकल्प २००१ मध्ये स्थापित करताना ८७,६८५ झाडांची कत्तल करण्यात आली. तरी नियमांचे उल्लंघन करुन त्याप्रमाणात वृक्ष लागवड करण्यात आलेली नाही. नियमाप्रमाणे कंपनीस ८७६८५० झाडे लावणे बंधनकारक होते. कंपनी प्रशासनाने नियम पाळले असते तर वातावरणात बदल झाला असता, प्रदूषण कमी झाले असते. मात्र कंपनीने कुठल्याही प्रकारची वृक्षलागवड केलेली नाही. येथे घनदाट जंगल होते, येथील आदिवासी, शेतकरी जंगलात | प्रकल्प प्रवर्तकांनी यांनी उत्तर देताना सांगितले की आपण वृक्षारोपणाचा मुद्दा उपस्थित केलेला आहे. त्यावेळी श्री बेले आक्षेप नोंदविला की २००१ च्या अगोदर कंपनीने ८७६८५ झाडांची कत्तल केलेली आहे. तर त्याबाबत उत्तर देण्यात यावे. प्रकल्प प्रवर्तकांनी उत्तर दिले की आम्हांला प्रकल्पाच्या ३३% हरित पट्टा विकसित करणे बंधनकारक असून प्रकल्प क्षेत्रात आम्ही हरितपट्टा विकसित करत असतो. दरवर्षी त्याचा लेखाजोखा (Audit) |

| | | |
|---|---|---|
| | जाऊन उदरनिर्वाह करत होते, त्यांच्या उदरनिर्वाहावर (livelihood) घाला घालण्यात आला. त्यांची रोजीरोटी काढण्यात आली, त्यांच्या शेतजमिनी घेतल्या, पण त्यांना रोजगारही देण्यात आलेला नाही. ही शोकांतीका आहे. या अंबुजा प्रकल्पामुळे गडचांदुर, आणि आजूबाजूच्या गावात प्रदूषणामुळे आरोग्यावर सर्वात मोठा धोका उत्पन्न झालेला आहे, असा जिल्हा परिषद, आरोग्यविभाग, चंद्रपूर यांचा मार्च, २०२३ चा अहवाल आहे. त्याच्यात ३६० नागरिक प्रदूषणग्रस्त आहेत आणि चार नागरिकांचा प्रदूषणामुळे मृत्यू दोन वर्षात झालेला आहे असे अहवालात नमूद केलेले आहे. त्या अहवालाची छायांकीत प्रत सादर करण्यात येत आहे. | तपासला जातो. दरवर्षी झाडांची संख्या ही मोजली जाते. त्यानुसार आमच्याकडे 35% हरित पट्टा विकसित करण्यात आलेला आहे. |
| ३) | प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी सादर केलेल्या पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालात त्यांनी हवा प्रदूषणाची पातळी (हवेचा इंडेक्स) जी दर्शविलेली आहे, ती पूर्णपणे खोटी आहे. पर्यावरण सल्लागार यांनी त्यांच्या सयंत्राव्दारे हवेची प्रदूषणाची पातळी तपासलेली आहे. तरी माझी विनंती आहे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अत्याधुनिक सयंत्राव्दारे येथील हवेच्या प्रदूषणाची पातळी ही तपासण्यात यावी. माहिती अधिकारात ज्यावेळी कंपनीची हवा प्रदूषणाची पातळीबाबत माहिती मागितल्यास ती मोठ्या प्रमाणात आढळते. हवेच्या प्रदूषणामुळे गडचांदुर रहिवाशांनी आंदोलनसुध्दा केलेले आहे. तरी कार्यरत प्रकल्पातील सर्व त्रुटी दूर केल्यानंतरच प्रकल्पाची जनसुनावणी परत घेण्यात यावी. | सूचनेची नोंद घेण्यात आली. |
| ४) | प्रकल्पातील वाहतुकीमुळे हवेत जे धुळीचे सूक्ष्मकण मिसळतात. प्रकल्प स्थापना करताना कंपनी व्यवस्थापनाने अभिवचन दिलेले होते की कंपनी सर्व प्रदूषण हे नियंत्रणात ठेवेल. ते त्यांनी पाळलेले नाही. आता नविन विस्तारिकरण प्रकल्पास परवानगी मिळण्यासाठी कंपनी प्रशासन खोटे आश्वासन देत आहेत. येथील स्थानिक | सूचनेची नोंद घेण्यात आली. |

| | | |
|---|---|---|
| | नागरिकांच्या जीवाला धोका निर्माण केलेला आहे. खाण कायदा, १९८३ नुसार ज्या जमिनीतून उत्खनन करून खनिजे काढण्यात येतात, मग ती चुनखडी, आयर्न, कोळसा खनिज असो, जसे खोदकाम कमी होत जाते, तसे दुसऱ्या भागात जमिन भरण्याची क्रिया सुरु करावी लागते. त्या खाण कायदा, १९८३ मध्ये दुरुस्ती करण्यात आली. तरीसुध्दा कंपनी खाण बुजवत नाही. | |
| ५) | तरी अध्यक्ष महोदयांना विनंती आहे की खाणकाम संपले की नियमाप्रमाणे बुजविण्याचेही काम झाले पाहिजे.<br>त्यांनी प्रदूषण न करण्याचे आश्वासन का पाळले नाही?<br>खोदकाम थांबल्यानंतर खाण बुजवणे बंधनकारक असताना कंपनी ती करत नाहीत, मग ती कुठलीही कपंनी असो, डब्ल्युसीएल असो, चुनखडी असो. तरी अध्यक्ष यांनी विनंती आहे की या क्षेत्रात जेवढ्या माईन्स आहेत, त्या नियमाप्रमाणे बुजविण्याचेही काम झाले पाहिजे. खाण बुजविल्यानंतर येथील शेतकऱ्यांना ती जमीन परत करण्याचाही कायदा आहे. मात्र खाणी बुजविल्या जात नाहीत. कारण तेथे शेतकऱ्यांना शेतजमिनीवर पीके काढणे बंधनकारक असल्याने व खाण बुजविण्यासाठी अवाढव्य खर्च होतो व तो शेतकऱ्यांचा फायदा होतो. शेतकऱ्यांची जमिन ही कंपनीला फक्त उत्खननापुरतीच दिलेली असते. प्रकल्प पूर्ण झाला की जमिन शेतकऱ्यांना परत देण्याचा नियम आहेत. १८५८ च्या कायद्यात व १९६८ च्या कायद्यात लिहिलेले आहे. पण त्या नियमांचे पालन होत नाही. | सूचनेची नोंद घेण्यात आली. |
| ६) | श्री राजेश बेले यांनी आक्षेप नोंदविला की कंपनीने मल्टी-स्पेशॅलिस्ट हॉस्पिटल येथील स्थानिकांसाठी का नाही उभारले? जनसुनावणी बैठकीत आश्वासन दिले जाते, नंतर काहीही करत नाहीत. छोटीमोठी आरोग्य शिबिरे आयोजित केली जातात. येथील स्थानिकांची जमीन घेऊन पैसे | सूचनेची नोंद घेण्यात आली. |

| | | |
|---|---|---|
| | कंमवणारी कंपनी स्थानिकांच्या आरोग्याचा काळजी का घेत नाही? ही शोकांतिका आहे. तरी प्रकल्प सुरु होण्याअगोदर बाधित गावात एक मल्टी-स्पेशॅलिटी हॉस्पिटल येथे उभारावे, तरच नविन प्रकल्पास मंजूरी देण्यात यावी. अन्यथा या प्रकल्पास आमचा विरोध आहे. | |
| ७) | श्री राजेश बेले यांनी किती वृक्ष लावले याचा आकडा सांगण्याची सूचना केली. | प्रकल्प प्रवर्तकांनी यांनी सांगितले की प्रकल्पात आठ लाख वृक्ष लावलेले आहेत |
| ८) | त्यावेळी श्री बेले यांनी उपस्थितांना आठ लाख वृक्ष प्रक्ल्पात आहेत का याबाबत उपस्थितांना विचारणा केली. श्री बेले यांनी सांगितले की नियमाप्रमाणे कंपनीस ८७६८५० वृक्ष लावणे बंधनकारक आहे. तर प्रकल्पात आठ लाख वृक्ष आहेत याबाबतचा शासकीय पत्र/अहवाल दाखविण्यात यावा. | प्रकल्पाचे कार्यकारी संचालक यांनी सांगितले की १०-१५ मिनिटांचा वेळ दिल्यास त्याबाबतची माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल. |
| ९) | श्री बेले यांनी प्रकल्प प्रवर्तकांना प्रदूषणाबाबत केलेल्या उपाययोजनांची माहिती देण्याची सूचना केली. कारण महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ व केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अहवालानुसार अंबुजी कंपनी ही सर्वात जास्त प्रदूषण करणारी कंपनी आहे. निरीचा अहवाल तसाच आहे. तर कंपनीने अजूनही प्रदूषण का कमी केले नाही. | प्रकल्प प्रवर्तकांनी यांनी सांगितले की म महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अनुमतीनुसार पारित केलेली मानके (prescribed standards) पाळण्यात येतात. प्रकल्पाच्या चारी बाजूस हवा प्रदूषणाची पातळ मोजण्याची सयंत्रणे आहेत. |
| १०) | त्यावेळी श्री बेले यांनी वाचून दाखविले की १७ एप्रिल, २०२३ – $SO_२$ – ८१३.०; १३ मार्च २०२३ - – $SO_२$ – ४१२.०; $PM_{१०}$ – २१२.०; परवाचा - $SO_२$ – १५१६.० , | प्रकल्प अधिकारी यांनी सांगितले की प्रकल्पास मानके ठरवुन दिलेली आहेत. आपण तारखांप्रमाणे सांगत असल्याने कंपनी प्रशासन संपूर्ण त्याची तपासणी करेल. पण आमचे रिडिंग हे पारित मानकांपेक्षा कमी असतेच. त्यांनी कंपनीस कोणत्या प्रकारची उपाययोजना करणार आहात याविषयी माहिती विचारली. त्यावेळी प्रकल्प अधिकारी यांनी सांगितले की -<br><br>अ) प्रकल्पात प्रदूषण नियंत्रण संयत्रणा ही इंटरलॉक आहे. ब) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या निर्देशांनुसार नियमितपणे सर्व सयत्रांची तपासणी करण्यात येते, |

| | | |
|---|---|---|
| | | क)प्रकल्पात केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या निर्देशांनुसार ऑनलाईन मॉनिटरिंग सयंत्रणा कार्यान्वित असून त्याचा डिसप्ले हा कंपनीच्यी मेन गेटजवळ दाखविण्यात येतो.<br>ड) वेळोवेळी रस्त्यावर पाणी शिंपण्यात येते,<br>इ) पावसाळ्यात वृक्ष लागवडीचा कार्यक्रम वेळोवेळी राबविण्यात येतो, |
| ११) | श्री बेले यांनी सांगितले की पर्यावरण कायद्यानुसार महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ विविध पर्यावरण कायद्यांची अंमलबजावणी करते, तर प्रदूषण नियंत्रणात व पारित मानकांमध्ये आणण्याचे काम हे कंपनीचे आहे. जनहितासाठी प्रदूषण कमी करणे हे आपले कर्तव्य आहे. स्वच्छ पर्यावरण हा सर्व मानवजातीचा अधिकार आहे. तो आपण काढू शकत नाही. बैठकीतील ८५% लोक हे प्रदूषणाचे शिकार झालेले आहेत. | प्रकल्प अधिकारी यांनी सांगितले की सर्वांचा स्वच्छ पर्यावरण हा हक्क आहे. कंपनीची जबाबदारी आहे, त्यानुसार आम्ही पारित निर्देशांचे तंतोतंत पालन करत असून विविध पर्यावरण संरक्षण योजना राबवित असतो. आम्ही Continuous Monitoring करत असतो. आम्ही प्रदूषण नियंत्रणास बांधिल असून आम्ही त्याप्रमाणे काळजी घेत असतो. |
| १२) | श्री बेले यांनी आक्षेप नोंदविला की येथील कंपन्या ह्या रात्री प्रदूषण नियंत्रण संयत्रणा रात्री बंद करतात, कारण प्रदूषण नियंत्रण संयत्रणेचा देखभाल खर्च (Maintenance) वाचवतात. | प्रकल्प अधिकारी यांनी सांगितले की प्रकल्पातील धुळ कॉलनीत येते. आम्ही प्रकल्पात अत्याधुनिक प्रदूषण नियंत्रण सयंत्रणा कार्यान्वित केलेली आहे. |
| १३) | वाहतुकीचे ट्रक्स येतात, ते रस्त्यात थांबतात. त्यामुळे स्थानिकांना वाहतुकीस अडथळा निर्माण होतो व त्यामूळे प्रदूषण होते. तरी कंपनीच्या हद्दीत ट्रक्स, टँकर यांची उभे राहण्याची व्यवस्था करण्यात यावी व तेथे स्थानिकांना पंक्चर काढण्याचे, चहासाठी दुकान काढण्याची मुभा द्यावी,त्यामूळे स्थानिकांना रोजगार व येणाऱ्या ट्रक्सची अडचड दूर होईल. | प्रकल्प अधिकारी यांनी सांगितले की ह्या सूचनेचा निश्चितच विचार करण्यात येईल. |
| १४) | श्री बोले यांनी आक्षेप नोंदविला की किती झाडे लावली याची माहिती उपलब्ध करण्यात आलेली नाही. सदरहू सुनावणी ही पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी असूनही प्रकल्प प्रवर्तकांकडे पर्यावरणविषयक माहिती नाही असे दिसून येते. | सूचनेची नोंद घेण्यात आली. |

| | | |
|---|---|---|
| | आपण आठ लाख झाडे लावली नाहीत, ही चुकीची माहीत जनतेस देत आहेत. त्याचपमाणे स्थानिकांची मागणी आहे की आयटीआय फीमध्ये सवलत देण्यात यावी. मात्र मी मागणी करत आहे की स्थानिकांना पूर्ण फी माफ करण्यात यावी. सीएसआर निधीतून सर्व गावातील मुलांचे आयटीआय शिक्षण हे मोफत होणे गरजेचे आहे. | |

५) <u>श्री शंकर तोडासे, सरपंच, मांगी बुद्रुक, जिल्हा-चंद्रपूरः-</u>

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | मी अंबुजा कंपनीमुळे गावाला ज्या चांगल्या गोष्टी मिळाल्या, त्याची माहिती व सामाजिक प्रश्नांवर माहिती देत आहेत:-<br>इतर कंपन्यांपेक्षा अंबुजा सिमेंट फाऊन्डेशन हे सामाजिक कार्यात निश्चितच चांगले काम करत आहे. गावात अनेक रस्त्यांचे बांधकाम या कंपनीतर्फे झालेले आहे. व्यायामशाळा, प्रत्येक शाळेत बोलक्या भिंती, वाचनालय, ई-लर्निंग व्यवस्था, अंबुजा सिमेंट फाऊन्डेशन राबविल्या आहेत. तसेच शाळांचा दर्जा सुधारण्यासाठी अनेक प्रयत्न करण्यात आले. तसेच महिला सक्षमीकरणामध्ये बचत गटाच्या माध्यमातून कुकुट्टपालन, शेळी पालन असे छोटे छोटे अनेक व्यवसाय उभारण्यात आलेले आहेत. येथे आदिवासी समाज मोठ्या प्रमाणात असून आधी महिला येऊन त्यांच्या अडचणी सांगण्यास घाबरत असत. यानंतर त्या पुढे येऊन सांगू लागल्या. | सूचनेची नोंद घेण्यात आलेली आहे. |
| २) | तसेच पाण्याचे नियोजन होण्यासाठी जिल्हा परिषद शाळांना व गावांना शुध्द पाणी मिळावे म्हणून छोटेछोटे आर.ओ. प्लॅन्ट देण्यात आलेले आहेत. तसेच शेती ओलिताखाली यावी म्हणून मांगीमध्ये मोठ्या बंधा-यात अनेक बंधाऱ्याचे बांधकामाचे कामकाज करण्यात आले. | प्रकल्प प्रवर्तकांनी यांनी सांगितले की मांगी गाव हे मॉडेल गाव म्हणून पुढे आलेले आहे. त्याबद्दल सर्व गावक-यांचे अभिनंदन. सीएसआर निधी योग्य प्रकारे मांगी गावात खर्च करत आहेत, ते आम्हांला व आपल्याला चांगलेच वाटत असेल. |

| | | |
|---|---|---|
| | खोलीकरण, सरळीकरण या दृष्टीकोनातून काम करण्यात आलेली आहेत. कमी पाण्यात शेती चांगली व्हावी म्हणून ड्रीपची, स्प्रिंकलर्सी योजना, जैविक औषधी तयार करणे, शेततळे, छोटे बंधारे, नाल्यातील गाळ काढून तो शेतात टाकणे, अशी अनेक सामाजिक कामे झालेली आहेत. मांगी येथे एक ऑक्सिजन पार्क तयार करण्यात आलेला आहे. तेथे अंबुजा तर्फे ६००० वृक्षांची लागवड करण्यात आलेली आहे. आम्ही ग्रामपंचायतीतर्फे ४००० अशी एकत्र दहाहजार वृक्षांची लागवड करण्यात आलेली आहे. जी झाडे जगली,त्यांचे संगोपन स्थानीक लोकांकडून करण्यात येत आहेत. त्यामुळे सर्व मांगी ही हिरवीगार दिसत आहे. अंबुजाच्या सहकार्याने मांगी गाव हे जिल्ह्यात स्मार्ट गाव झालेले आहे. हे सर्व अंबुजा सिमेंट फाऊन्डेशनमुळे झालेले आहे. | |
| ३) | आता या प्रकल्प विस्तारिकरणात अंबुजा सिमेंटने दत्तक गावांतील तरुण तरुणींना प्रकल्पात रोजगाराची संधी देण्यात यावी. तसेच मराठी स्थानिक जे वरिष्ठ (senior) आहेत, त्यांना प्रकल्पात कायम करण्यात आलेले नाही. परप्रांतीय जर कायम होतात, तर स्थानिक गेले अनेक वर्षे १०,०००/- ते १५,०००/- रुपयात काम करत आहेत. तरी त्यांना कायम सेवेत समाविष्ट करुन घेण्यात यावे. | त्यांनी सांगितले की कोअर-व्हिलेजच्या तरुण-तरुणींसाठी नोकरीबाबत आपण मुद्दा उपस्थित केलेला आहे. इतर लोकांना उत्तर दिल्याप्रमाणे आम्ही यादी तयार करु. त्यात काही त्रुटी असल्यास त्या दुरुस्त करण्यात येतील. जे तेथील स्थानिक आहेत व आमच्याबरोबर आहेत, त्यांना निश्चितच रोजगाराच्या संधीत प्राधान्य देण्यात येईल. आपण काही स्थानिकांना प्रकल्पात कायम सेवेत समाविष्ट करण्याची सूचना केलीयाबाबत येथे त्वरित माहीती देणे शक्य नाही. मात्र याबाबत बैठक बोलावून संबंधित कर्मचाऱ्यांना जास्त सुविधा देण्याबाबत काही विचार करता येईल. |
| ४) | कोअर व्हिलेजमधील आय.टी.आय मधील शिक्षण हे स्थानिकांना मोफत करण्यात यावे. | आपण आय.टी.आय मधील गरीब मुलांची फी माफ करण्याबाबत सूचना केलेली आहे. ती खूपच चांगली आहे. तरी याबाबत सकारात्मक निर्णय घेता येणे भविष्यात शक्य आहे का याबाबत विचार करण्यात येईल. |
| ५) | जसे मोठे बंधारे बांधण्यात आलेले आहेत, त्याप्रमाणेच छोट्या बंधाराचे, नाले खोलीकरण | ड्रिप इरिगेशनबाबत स्थानिक शेतकऱ्यांना पैसे डिपॉझिटमध्ये सवलत देण्याची सूचनेस उत्तर |

| | | |
|---|---|---|
| | करण्यात यावे. सगळीकडे पाणी उपलब्ध होईल व शेतीस पाणी भरपूर मिळेल. जी गरीब गावे आहेत, त्यांना ड्रीप इरिगेशनमध्ये खर्चात सवलत देऊन त्या योजना पूर्ण करणे गरजेचे आहे. छोट्या शेतकऱ्यांना कंपाऊंडची सुविधा उपलब्ध करुन द्याव्यात | देताना कंपनी अधिकारी यांनी सांगितले की ही अतिशय चांगली सूचना असून त्यासाठी धोरण ठरविताना सर्व बाबींचा विचार करुन जास्तीतजास्त शेतकऱ्यांना त्याचा फायदा कसा होईल याबाबत अभ्यास करण्यात येईल |
| ६) | जरी आमचे स्मार्ट गाव आहे. तरीही विखुरलेले शेणाचे ढिगारे आहेत, ते चांगले वाटत नाहीत. जरी शेण कुजण्यासाठी ठेवले जाते, तरीही ५००-१,००० रुपये योगदान घेऊन ते स्वच्छ करण्यात यावे.<br>बचतगटांना १० ते २० लाख रुपये कर्ज देऊन बचतगट सक्षम कसे होतील याचा विचार अंबुजानी करायला पाहिजे. | तसेच शेणाचे ढिगारे आपण सांगितल्याप्रमाणे शेतक-यांकडून योगदान घेऊन कशाप्रकारे चांगल्या पध्दतीने काढण्यात येतील, याबाबत स्थानिक शेतकऱ्यांशी चर्चा करुन निश्चितच निर्णय घेण्यात येईल. |
| ७) | मांगी बुद्रुक येथील एकच गाव दत्तक घेतलेले असून इतर गावे सुटलेली आहेत उदा- मांगी खुर्द, रांजीगुडा व खैरगुडा. या गावांचा समावेश करुन त्यांनी सवतली दिल्यास ते योग्य होईल. | प्रकल्प अधिकारी यांनी सांगितले की त्याबाबत येथे निर्णय घेणे शक्य नाही, मात्र त्याबाबत थोडे काम हाती घेता येईल. त्यासाठी कंपनी प्रशासन हे बैठकीत निश्चित विचार करेल. आपण जो गट केलेला आहे, त्यात काही बदल किंवा त्यात काही सुधारणा करणे गरेजेचे आहे काय यासाठी नियोजन करावे लागेल. ते आपल्याशी चर्चा करुनच ठरवावे लागेल. |
| ८) | रस्त्याच्या कडेला जागा असते, तर तेथे माईन्समधील माती मिळाली तर तेथे आम्हांला वृक्षलागवड करता येईल | कंपनी अधिकारी यांनी सांगितले का याबाबत माईन्सच्या प्रशासनाशी चर्चा करुन सकारात्मक निर्णय घेण्यात येईल. |

६) **श्रीमती ताई केळवतकर, राहणार-थुटरा, तालुका-कोरपना, जिल्हा-चंद्रपूर:-**

| **अनु. क्रं.** | **आक्षेप/सूचना/प्रश्न** | **चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने** |
|---|---|---|
| १) | मी साधारण महिला आहे. अंबुजा सिमेंटमध्ये आम्ही बचतगट सुरु केलेला होता. मला काहीही माहित नव्हते की आपला विकास आपण कसा करायचा? विविधि बैठकीत बचत करुन कसा विकास करता येईल याची माहिती आम्हांला झाली. बैठकीत गाव विकासासाठी हातभार | **सूचनेची नोंद घेण्यात आली.** |

| | | |
|---|---|---|
| | लावता आला. आता बजत गटातून महिलांचा कसा विकास करता येईल त्यासाठी मी काम करते. महिलांना प्रशिक्षण देऊन महिलांना स्वतःच्या पायावर उभे करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. पूर्वी कोणाच्याही घरी कामाच्या बैठका घ्याव्या लागत. आताअंबुजा सिमेंट त्यांचा हॉल उपलब्ध करुन देत असल्याने सर्व महिलांशी बोलता येते, सर्व विषयांची मांडणी करता येते. आपला विकास आपण स्वतः करावा, त्यासाठी मार्गदर्शन मिळाले. त्याचबरोबर गावाच्या विकासातही बचतगटामुळे सहभागी होता आले. हे सर्व अंबुजाच्या सामाजिक योगदानामुळे झालेले आहे. | |

## ७) <u>श्री देविदास मुकुरमरे, राहणार-तालीगोडा,जिल्हा- चंद्रपूरः-</u>

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | सोनापूर ३५ लोकांच्या शेत्या कंपनीने घेतल्या आहेत. पण एकही माणूस प्रकल्पात रोजगार म्हणून कामास घेतलेले नाही. २२-२३ मुलांना रोजगाराच्या संधीपासून वंचित ठेवण्यात आलेले आहे. कंपनीने जमिनी घेऊन २०-२२ वर्षे होत आहे. दुसऱ्याच्याकडे कामास जातात, एक दिवस काम मिळते, दुसरे दिवशी मिळेल असे नाही. जर प्रत्येक कुटुंबातील एक मुलगा कामास घेतला असता, तर आमचे प्रश्न सुटले असते. शेती गेली, नोकरी नाही, म्हणून मुलांची लग्ने होत नाहीत. आज बैठकीस आलो, तर सर्वांची मुले आशा लावून बसली आहेत की नोकरी मिळेल. २-३ वर्षांपूर्वी आम्ही मोर्चा काढला. सकाळी निघालो, तर दुसऱ्या दिवशी संध्याकाळी जिल्हाधिकारी कार्यालयात पायी-पायी पोहोचलो. त्यावेळच्या जिल्हाधिकारी यांनी आश्वासन दिले की ४५ दिवसानंतर ४६ दिवशी कुटुंबातील एकास नोकरी देण्यात येईल. अजून काहीही झालेले नाही. आम्ही | सूचनेची नोंद घेण्यात आली. |

| | | |
|---|---|---|
| | घरी गेल्यावर मुलांना काय सांगणार? तरी आम्हांला नोकरी कधी लागेल याची तारीख द्यावी. | |
| २) | त्यांनी पुढे सांगितले की सोनापूर मधील सालीगोडा व उपरवाही येथे रस्ता नाही. कंपनीने रस्ता तयार करण्याचे आश्वासन दिलेले होते. अजूनही झालेले नाही. तो रस्ता तयार करुन द्यावा. | सूचनेची नोंद घेण्यात आली. |
| ३) | तिसरा मुद्दा अंबुजा फाऊन्डेशनतर्फे २००६-२००७ साली सालीगुडा नाल्यावर बंधारा बांधून दिला. त्यामुळे मे-जुनपर्यंत पाणी थांबत होते. बोअरिंगलाही पाणी मिळत होते. जनावरांना पाणी मिळत होते. ४०-४५ एकर शेती ओलिताखाली आली. शेतकरी विविध पीके घेत होते. म्हणजे कंपनीने खूप चांगली कामे केलेली आहेत. माझ्या गावात पाण्याची चांगली सुविधा केली. | सूचनेची नोंद घेण्यात आली. |
| ४) | अंबुजा सिमेंटने आमच्या गावात दोन आशा ताई नियुक्त केल्या आहेत. ते घरोघरी जाऊन वृध्दांना मदत, औषधे पुरवितात. त्याचप्रमाणे एक सामुदायिक दवाखाना काढलेला आहे. आमची विनामुल्य तपासणी होते व गोळ्या ह्या अर्ध्या किंमतीत मिळतात. शुध्द पाण्यासाठी आर.ओ. मशिन लावलेले आहे.<br>तरी अंबुजा व्यवस्थापनास विनंती आहे की आमच्या मुला-मुलींना रोजगाराची संधी देण्यात यावी. | सूचनेची नोंद घेण्यात आली. |

८) **<u>सौ. नेहा जगताप, राहणार-लखमापूर, तालुका-कोरपना, जिल्हा-चंद्रपूरः-</u>**

| **अनु. क्रं.** | **आक्षेप/सूचना/प्रश्न** | **चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने** |
|---|---|---|
| १) | १९४ साली लग्न झाले, त्यावेळी लखमापूर गावात रस्ता नव्हता. आरोग्याच्या समस्या भरपूर होत्या. तरुण मुला-मुलींना काम नव्हते. २००० साली अंबुजा सिमेंटने पाण्याच्या समस्येसाठी गावागावात स्थानिकांच्या मदतीने शोष खड्डे तयार केले, त्यामुळे पाण्याची पातळी वाढविली. त्यामुळे आमच्या गावात सर्वसाधारण पाणी मिळत आहे. | सूचनेची नोंद घेण्यात आली. |

| | | |
|---|---|---|
| | शुध्द पाण्यासाठी आर.ओ. प्रकल्प कार्यान्वित करण्यात आलेला आहे. गावात स्वच्छता नसल्याने मलेरिया, डायरियासारखे आजार होत असत. शेतात महिला कामास जात,लहान मुले घरी ठेऊन कामास जात, लहान बाळाचे कुपोषण होत असते. त्यासाठी अंगणवाडी तर्फे लहान मुलास आहार देण्यात येतो. | |
| २) | जे रुग्ण हे गंभीर आजारीआहेत पण खाजगी दवाखान्यात जाऊ शकत नाही, त्यांचे पाचशे रुपये अंबुजा सिमेंट भरत असून त्या रुग्णास वैद्यकीय उपचार देत आहे. आमच्या गावात सब-सेंटर आहे. सब-सेंटरची, अंगणवाडीची रंगरंगोटी करुन दिलेली आहे. | सूचनेची नोंद घेण्यात आली. |
| ३) | महिला सक्षमीकरणासाठी कंपनी बरीच मदत करते. समाजातील २०% महिला आहेत की त्या घराबाहेर पडत नव्हत्या. महिलांना प्रशिक्षण देऊन त्यांची आर्थिक दर्जा उंचावण्याचा प्रयत्न करत आहे. आमच्या गावात अंबुजा सिमेंटने आय.टी.आय. सुरु केलेले आहे. नर्सिंगसाठी मुली जातात, त्यांना सहाशे रुपये भत्ता देण्यात येतो. त्यांचा एन.एम.चा कोर्स करुन बाहेर ठिकाणी रोजगारासाठी पाठविण्यात येते. दहा-बारा हजार त्यांच्यासाठी कंपनी खर्च करते. | सूचनेची नोंद घेण्यात आली |
| ४) | कोविड काळात अंबुजा सिमेटने ऑनलाईन बैठका घेऊन लोकांमध्ये जनजागृती केली, मार्गदर्शन केले. घरकामास जाणाऱ्या बायकांना कोविड काळात बाहेर जाणे शक्य नव्हते, त्यावेळी अंबुजा सिमेंटने त्यांना आहाराची पाकिटे पुरविली. घरोघरी मास्क, सॅनिटायझरच्या बाटल्या पुरविल्या. लखमापूरचे बरेच रोगी कोविड काळात मरण पावले. त्यांना मानसिक धीर देण्यात आला. त्यावेळी मला कामाची गरज होती. कंपनीकडे गेले, तर त्यांनी मला आरोग्य सखी म्हणून काम मिळवून दिले. अंबुजा फाऊन्डेशन माझे व माझ्यासारख्या अनेकांचे मार्गदर्शक आहेत. तरी अंबुजा फाऊन्डेशन ही आरोग्यावर काम | सूचनेची नोंद घेण्यात आली |

| | | |
|---|---|---|
| | करणारी, शिक्षणात काम करणारी, जनजागृती करणारी मार्गदर्शक आहे. सर्व सामाजिक क्षेत्रात काम करत आहे. त्यांना मानाचा मुजरा. | |

## ९) श्री भीमराव गोसावी चांदोरकर, एक शोषित पिडीत बेरोजगार युवक –

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | २० वर्षापूर्वी जेथे अंबुजा प्रकल्प उभा आहे, त्या जमिनी आमच्या पूर्वजांच्या आहेत. त्या जमीनीवर कंपनी असून कामगारांच्या मेहनतीवर कंपनी वाढली व रोजगार चालू आहे. तर जमिनी मोबदल्यात अंबुजाने आपल्याला काय दिले हा मोठा प्रश्न आहे.<br>तर अंबुजा फाऊन्डेशने प्रकल्पग्रस्तांबरोबर करार केला. त्यातील १० नंबरचा मुद्दा (२) वाचून दाखवितो -<br>The preference shall be given to affected land losers for providing employment opportunities in Grade – III and IV, clerical and sub staff category, relaxation in eligibility criteria will be considered on the merits of the individual case.<br>याचा अर्थ भविष्यात जर प्रकल्पात रोजगाराची संधी प्राप्त झाली, तर प्राधान्य कोणाला मिळेल, तर land losers ला मिळेल. तर गेले १५-२० वर्षे प्रकल्पात रोजगाराची संधी तयार झाल्या नाहीत काय?तर येथे उपस्थितांनी सांगितले की त्यांच्याकडे प्रकल्पग्रस्तांची यादीच आहे. तर प्रकल्पग्रस्तांना प्राधान्य का बरे दिले गेले नाही? याबाबत अंबुजा सिमेंटची भूमिका काय हे येथे स्पष्ट करण्यात यावे. गेले २०-२५ वर्षे आम्ही फक्त आश्वासनच ऐकत आलेलो आहोत. किती दिवस प्रकल्पग्रसांनी बेकार राहायचे? कंपनीने | सूचनेची नोंद घेण्यात आली. |

| | | |
|---|---|---|
| | नफा कमवावा, पण गेले २५ वर्षे बेकार राहिलेल्या प्रकल्पग्रस्तांना न्याय द्यावा. | |

१०) <u>इंदिरा बंडवाल, राहणार-थुटरा, तालुका-राजूरा, जिल्हा-चंद्रपूरः-</u>

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | माझे स्वतःचे कुक्कुटपालन आहे. मला अंबुजा फाऊन्डेशनतर्फे मदत मिळाली. नंतर मी थोडेसे कर्ज घेतले व आता मी स्वतः कुक्कुटपालन करत आहे. अंबुजी, माणीक गावांना मी अंडी पुरवत असून रोगी माणसांना व इतरांना त्याचा फायदा होतो. माझे एवढेच म्हणणे आहे की थुटऱ्याचा आर.ओ. बंद पडलेला आहे. आर.ओ. लावल्यानंतर तेथील आजार कमी झाले. तरी आर.ओ त्वरित चालू करून द्यावा ही विनंती. | सूचनेची नोंद घेण्यात आली. |

११) <u>प्राध्यापक सुधीर निवृत्ती, महात्मा गांधी ज्युनिअर कॉलेज –</u>

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | मी लखमापूरला राहतो. या ठिकाणी दत्तक घेतलेल्या १२ गावातील अनेक लोक आलेले आहेत. या कार्यक्रमाचा उद्देश लोकांनी जाणून घेतला पाहिजे. येथे पर्यावरणाचा, आरोग्याचा व रस्त्याचा, पाण्याचा महत्वाचा मुद्दा आहे. आज लखमापूरला खाण झालेली आहे. चुनखडी, मोठेमोठे दगड कंपनीला पाठविण्यात येतात. तेथे उत्खनन होत आहे. पाण्याची पातळी खालवत आहे. मात्र हे मुद्दे स्थानिक लोक विसरलेले दिसतात. अंबुजा फाऊन्डेशनतर्फे बऱ्याच महिलांना सक्षमीकरण करण्यास मदत करण्यात आली, याबद्दल धन्यवाद. मात्र आजच्या बैठकीत | सूचनेची नोंद घेण्यात आली. |

| | | |
|---|---|---|
| | पर्यावरणविषयक, आरोग्यविषयक,पाण्याविषयक प्रश्न विचारण्यात यावेत. | |

१२) **श्री गजानन उध्दव बुऱ्हाण, राहणार-उप्परवाही, तालुका-कोरपना, जिल्हा-चंद्रपूर:-**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | जसे नाण्याला दोन बाजू असतात, तसेच कंपनीचे फायदे व तोटे राहणारच. अंबुजा आल्यापासून भरपूर विकास झाला हे आपण मानतो. अंबुजामुळेच आम्ही शाळा आयएसओ केली. अंबुजाने खूप आर.ओ. दिले, भरपूर मदत केली. पण आयटीआयमध्ये अंबुजा देणगी घेतात. कंपनीच्या धुळीचा, प्रदूषणाचा त्रास हा आम्हांला होतो. तर आयटीआयमध्ये, नोकरीत १२ गावातील मुलांना प्राधान्य देण्यात आले पाहिजे. एखाद्या युनियन लिडरच्या शिफारसीने मुलगा राहतो. त्यामुळे प्रकल्पग्रस्त गरीब मुलावर अन्याय होतो. एप्रेन्टीसशिपमध्ये स्थानिकांना डावलले जाते. | प्रकल्प अधिकारी यांनी उत्तर दिले की जे १२ गावे आहेत, तेथील मुलांनाच प्राधान्य दिले जाते आणी कंपनीतर्फे आश्वासन देण्यात येते की १२ गावातील लोकांनाचे प्राधान्य देण्यात येईल.<br>प्रकल्प अधिकारी यांनी सांगितले की पुर्वीच उत्तर दिल्याप्रमाणे स्थानिकांना सबसीडीत सवलत देण्यात येईल.<br>कंपनीत एप्रेन्टिसशिपसाठी काही अर्ज प्राप्त झालेली आहेत. ते मंजूर करुन पुढे पाठविण्यात आलेले आहेत. त्यावेळी प्रकल्प अधिकारी यांनी सांगितले की या वर्षी सर्वात जास्त म्हणजे २० मुलांची अंबुजातूनच एप्रेन्टिसशिपसाठी निवड झालेली आहे. शिवाय येथे २०-२५ मुले एप्रेन्टिस येथे उपस्थित आहेत की त्यांचे आयुष्य मार्गी लागले आहेत.<br>त्याचप्रमाणे बरेच मुले आहेत की एप्रेन्टिसशिप अंबुजात करुन नोकरीसुध्दा अंबुजात मिळालेली आहे. प्रकल्प कार्यकारी संचालक यांनी सांगितले की रोजगाराच्या संधीत प्राधान्य देण्यात येईल, त्याचप्रमाणे एप्रेन्टिसशिप फीजमध्येही सवलत देण्यात येईल.<br>इंटर्नशिप आपणास देण्यात येईल. |
| २) | त्याचप्रमाणे कंपनी चालवायची आहे, तर मनुष्यबळ हे लागणारच आहे. कंपनी बाहेरुन मनुष्यबळ आणते, मग आमचे लोक काम करणार नाहीत का? जे चांगले काम करतात, त्यांना कंपनीने प्रोत्साहन दिले पाहिजे. बाहेरुन | प्रकल्प प्रवर्तकांनी यांनी सांगितले की कंपनीच्यी ध्येयधोरणानुसार रोजगार संधीत प्रथम प्रकल्पग्रस्त व स्थानीक यांनाच प्राधान्य देण्यात येते. आताही देण्यात येते व भविष्यातही देण्यात येईल. |

| | | |
|---|---|---|
| | आणण्यापेक्षा गावातील लोकांना रोजगार दिला पाहिजे. अंबुजाने आयएसओ शाळा, मोबाईल हॉस्पिटल चालू केले. तसेच एखाद्या स्थानिक जो हॉस्पिटलचे पैसे भरू शकत नाही, त्यासाठी एखादी वीमा पॉलिसी तयार करावी व त्यास आर्थिक मदत करावी. हे स्पर्धेचे युग आहे. तरी अंबुजाने एमपीएसी, युपीएससी परिक्षांसाठी मार्गदर्शन करावे. कंपनीला कंपनी चालवायची आहे, तर लोकांना येथे राहयचे आहे. तरी परिसराचा, राज्याचा व देशाचा विकास कसा करता येईल ह्याचा दोघांनीही विचार करणे गरजेचे आहे. | |
| ३) | गरीब माणसाचा जीव वाचण्यासाठी आपण हॉस्पिटल बांधू शकता काय? | प्रकल्प प्रवर्तकांनी यांनी सांगितले की कॉलनीमध्ये हॉस्पिटल आहे. परिसरातील लोक येतात,त्यांना वैद्यकीय सुविधा देण्यात येते व भविष्यातही ती देण्यात येईल. |
| ४) | प्रकल्पात एएफआर जे वापरण्यात येते, ते वापरण्यात येऊ नये. कारण त्याची मोठ्या प्रमाणात दुर्गंधी येते. | प्रकल्प प्रवर्तकांनी यांनी सांगितले की एएफआर ज्याने दिले त्या सप्लायरला आम्ही बंद केलेले आहे. आता दुर्गंधी येत नाही. कारण त्यावर लिक्विड मारण्यात येते, त्यामुळे आम्हीपण त्याच्याजवळ काम करत असतो.<br>प्रकल्पाचे कार्यकारी संचालक यांनी डस्ट प्रदूषण न होण्यासाठी वृक्षलागवड करण्याचे आश्वासन दिले. |

१३) **<u>श्री अनिल कौवासे, उपसरपंच, उप्परवाही, तालुका-कोरपना, जिल्हा-चंद्रपूर</u>:-**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | आज आपण पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी घेत आहोत. माझे गाव उपरवाही हे कंपनी लगतच आहे. आजूबाजूच्या शेतीवर कंपनीची धूळ पडते व नंतर त्यांचे अर्ज हे ग्रामपंचायतीस येतात. याबाबत आम्ही कंपनीसोबत चर्चा करतो. | पुढील मुद्दा प्रकल्पाचे कार्यकारी संचालक यांनी सांगितले आपण दुर्गंधीबाबत आक्षेप नोंदविलेला आहे. तर दुर्गधीबाबत पुढील कार्यवाही करण्यास आम्हांला वेळ लागला. भविष्यात दुर्गंधीचा त्रास होणार नाही. |

| | | |
|---|---|---|
| २) | दुसरा मुद्दा कंपनी आहे म्हणजे तापमान राहणारच. तर त्यासाठीही काही बंदोबस्त करणे आवश्यक आहे. तसेच ह्या १२ गावातील जे बेरोजगार तरुण आहेत, त्यांनाच प्रकल्पात रोजगारात प्राधान्य देण्यात यावे. त्यांची निवड ज्या संवर्गात झाली, त्या संवर्गाचे काम त्यांना देण्यात यावे. | सूजनेची नोंद घेण्यात आली. |
| ३) | त्यांनी पुढे सांगितले की येथे वन्यप्राणी-वाघ आलेला होता. आम्ही वनविभागास विनंती केली, त्यानुसार पिंजरे लावण्यात आलेले होते. याची नोंद कंपनीने घेणे आवश्यक आहे. | सूचनेची नोंद घेण्यात आली. |
| ४) | तसेच गावातील लोकांची माझ्याकडे ब्लास्टींगची तक्रार आलेली आहे. जर कंपनी स्थानिकांशी सहकार्य करेल, तर स्थानीकसुध्दा कंपनीशी सहकार्य करणार. पण जर ग्रामपंचायतीची किंमत ठेवली नाही, तर नकार दिला जाईल. ग्रामपंचायतीस तेवढा अधिकार आहे. कंपनीने कंपनीत होणाऱ्या रोजगार संधीबाबत बारा गावातील सर्व ग्रामपंचायतीस संपर्क साधण्यात यावा. सर्व ग्रामपंचायतीस कुठल्या संवर्गातील किती पदे आहेत यांची खुलाशेवार माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी | सूचनेची नोंद घेण्यात आली |
| ५) | कंपनीने पिण्याची पाईपलाईन घेतलेली आहे. रस्ते झाले आहेत, शाळांची सुधारणा झालेली आहे. कंपनीने असेच चांगले काम करावे.<br>त्यांनी पुढे सांगितले की जे मेडिक्लेम आहे, त्याचे कॅशलेस एक किंवा दोनच दवाखाने फक्त चंद्रपूरला आहेत. तेथे ट्रीटमेंट होत नाही. तरी त्या मल्टीस्पेशॅलिटी हॉस्पिटलची कंपनीने नेमणूक करावी. म्हणजे व्यक्ती त्या दवाखान्यातही जातील. | प्रकल्प प्रवर्तकांनी यांनी सांगितले की कंपनीने केलेल्या चांगल्या कामाची दखल श्री अनिलजी यांनी घेतली त्याबद्दल धन्यवाद. तसेच त्यांनी अपेक्षिलेल्या विविध कामांसाठी त्यांच्याशी चर्चा करुन मार्ग काढण्यात येईल. |
| ६) | त्यांनी आक्षेप नोंदविला की जे धुळीचे प्रदूषण (dust pollution) होत आहे, ते गावासाठी घातक आहे. त्याबाबत उत्तर देण्यात यावे. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की डस्ट नियंत्रणासाठी उपाय योजना करण्यात येतील. |
| ७) | कोलयार्डच्या मागील बाजूस ज्यांची शेती आहे, त्यांचे बरेच नुकसान होत आहे उदा. श्री मटाले, श्री मुसळे. त्यांच्या शेतात सिमेंटचा डस्ट, कोळशाचा | प्रकल्पाचे कार्यकारी संचालक यांनी सांगितले की उप विभागीय अधिकारी, चंद्रपूर, शेती विभाग, पर्यावरण विभाग यांनी भेट देऊन |

| | | |
|---|---|---|
| | डस्ट त्यांच्या शेतातील पीकांवर पडतो, त्यामुळे त्यांचे बरेच नुकसान होत आहे. | पाहणी अहवाल सादर केलेला आहे. त्यांचा अहवाल अपेक्षित आहे. अहवाल आल्यानंतर जे निर्देश असतील, ते तंतोतंत पाळण्यात येतील. |

१४) **श्री लक्ष्मण एकनाथ मखले, राहणार-मांगी बुद्रुक, जिल्हा-चंद्रपूरः-**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | या परिसरात अंबुजा सिमेंटच्या वतीने आयटीआय सुरु करण्यात आलेले आहे. त्यामुळे या परिसरातील युवकांना कौशल्य प्रशिक्षण मिळत आहे. रोजगाराची संधीसुध्दा मिळत आहे. मीपण अंबुजा आयटीआय मध्ये वेल्डर ट्रेड केलेला आहे व अंबुजाकडून मला एप्रेन्टीशिप मिळालेली आहे. मला येथे रोजगार मिळालेला आहे. | सूचनेची नोंद घेण्यात आली. |

१५) **सीमा दुरटकर, राहणार-उप्परवाही, तालुका-कोरपना,जिल्हा-चंद्रपूरः-**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | महिला सबलीकरण अंतर्गत जी चांगली कामे झाली ती मी सांगत आहे –<br>अंबुजा सिमेंटतर्फे गेले दहा वर्षात अनेक चांगली कामे झालेली आहेत. अंबुजाच्या निधीमुळे परिसरात ५८६ शौचालये बांधण्यात आलेली आहे. त्यामुळे खूप गावे ही हागणदारीमुक्त झालेली आहेत. त्यामुळे गावातील काही आजारांवर नियंत्रण आलेले आहेत. गावात जी घाण होत होती, ती बंद झाली. गाव हे स्वच्छ दिसत आहे. तसेच गावोगावी महिला बचत गटाच्यामार्फत उद्योगाला लागून महिलांची आर्थिक परिस्थिती सुधारण्यास मदत होत आहे. महिला सबलीकरणात निधी आल्यामुळे महिलांना | सूचनेची नोंद घेण्यात आली. |

| | | |
|---|---|---|
| | आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी त्यांनी पापड उद्योग, किराणा दुकान इ. साठी मदत मिळते. त्यामुळे येथील महिलाही स्वावलंबी व आर्थिकदृष्ट्या सबळ झालेल्या आहेत. त्यामुळे महिलांमध्ये आत्मविश्वास आलेला आहे. नारीशक्ती जागृत करण्याचे काम अंबुजा सिमेंटमार्फत झालेले आहे. तरी कंपनीच्या प्रदूषणाबरोबरच या चांगल्या गोष्टीही कंपनीच्या लोकांना लक्षात ठेवणे गरजेचे आहे. | |

**१६) <u>सौ. रश्मी फडतंडे, उप्परवाही, तालुका-कोरपना, जिल्हा-चंद्रपूर:-</u>**

| **अनु. क्रं.** | **आक्षेप/सूचना/प्रश्न** | **चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने** |
|---|---|---|
| १) | उपरवाहीच्या समस्या शेतीच्या, पाण्याच्या बैठकीत सांगण्यात आलेल्या आहेत. आमच्या गावातून वर जाणारा रस्ता आहे, तो रस्ता करणार होते. पाऊस झाला की पाणी जात नाही. आम्हाला जायला यायला रस्ता नाही. खूप त्रास होतो. आम्ही खूप दिवस मागणी करत आहोत, पण रस्ता झालेला नाही. तरी तो रस्ता झाला पाहिजे एवढीच मागणी आहे. मुरुम टाकला की वाहून जातो. आम्हांला पक्का रस्ता पाहिजे. | सूचनेची नोंद घेण्यात आली. प्रकल्प प्रवर्तकांनी यांनी सांगितले की आमचे ध्येय आहे की पावसाळ्याच्या पूर्वीच रस्ता झाला पाहिजे. आपणास पावसाळ्यात चांगलाच रस्ता मिळेल. |

**१७) <u>श्री वामनराव भिवापुरे, माजी उपसरपंच, ग्रामपंचायत थुटरा, तालुका-कोरपना, जिल्हा-चंद्रपूर:-</u>**

| **अनु. क्रं.** | **आक्षेप/सूचना/प्रश्न** | **चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने** |
|---|---|---|
| १) | बारा गावात जी अंबुजा फाऊन्डेशनची जी व्यवस्था त्याबद्दल धन्यवाद. माझ्या गावात २००२ पासून बरीच रस्त्याची, शाळेचे कपांऊड, शाळेत संगणक, २००७ मध्ये १७ पोल्स रस्त्यावरिल दिवे लावून दिले. येथे महिला येऊन निर्भयपणे बोलत | सूचनेची नोंद घेण्यात यावी. |

| | | |
|---|---|---|
| | आहेत, महिला सबलीकरणाचा हा विजय आहे, ही पुण्याई आहे अंबुजा फाऊन्डेशनची. त्यामुळे स्वत:च्या पायावर उभ्या आहेत, स्वावलंबी झालेल्या असून आत्मविश्वासाने दुसऱ्या गावात जाऊन नोकरी करत आहेत | |
| २) | त्यांनी सांगितले की जरी बैठकीत फक्त पर्यावरणविषयक सूचना, आक्षेप नोंदविण्याचे आवाहन करण्यात आले, तरीही स्थानिकांचे प्रश्न, समस्या याही लोकप्रतिनिधींना, स्थानिकांना सांगाव्याच लागतात. तर येथे जे जे प्रश्न उपस्थित करण्यात आले, त्यावर कंपनीने व शासनाने पुढील कार्यवाही करावी. त्याचप्रमाणे या बैठकीचे इतिवृत्त सर्व ग्रामपंचायत कार्यालयात उपलब्ध करुन देण्यात यावे. | सूचनेची नोंद घेण्यात यावी. |
| ३) | आता गावाच्या ज्या समस्या आहेत, त्या मी मांडत आहे –<br>ग्रामपंचायत टुथरा येथील शेतकऱ्यांची सर्वात जास्त जमिन अंबुजा सिमेंटकडून अधिग्रहित करण्यात आली. त्यावेळेस कंपनीचे बांधकाम झालेले नव्हते. त्यामुळे ग्रामपंचायतीस कर मिळालेला नाही. तर शासनाकडे खनिज विकास निधीकडून जो निधी जमा होतो, त्यातील १०% वगळून तो ग्रामपंचायतीस वर्ग करण्यात यावा अशी मी शासनास विनंती करतो. माझ्या कार्यकालात मा. जिल्हाधिकारी यांना तोंडी सूचना व ग्रामपंचायतीचा ठरावसुध्दा पाठविलेला आहे. | प्रकल्पाचे कार्यकारी संचालक यांनी सांगितले की आपण जिल्हा मायनिंग निधीतून 10% रक्कम ही ग्रामपंचायतीस देण्याची सूचना केलेली आहे. सदरहू बाब ही आमच्या अखत्यारित येत नाही. हा पूर्णपणे शासनाचा विषय आहे. |
| ४) | त्याचप्रमाणे काही प्रकल्पग्रस्त आहेत की ते कंपनीत कंत्राटी कामगार म्हणून काम करत आहेत. तरी त्यांना कंपनीच्या कायम सेवेतसमाविष्ट करुन घेण्यात यावे. त्याचप्रमाणे प्रकल्पग्रस्त असूनही गेले २०-२२ वर्षे जे बेकार आहेत, त्यांचा आता आक्रोश पाहिलेला आहे. तरी त्यांना प्रकल्पात रोजगाराची संधी देऊन न्याय देण्यात यावा. | सूचनेची नोंद घेण्यात आली. |
| ५) | २००० साली जमिन अधिग्रहित करताना खाजगी जमिनीबरोबरच काही सरकारी पडीक जमीन | आपण सरकारी जमिनी ही माईन्समध्ये आहे असे आपण सांगितलेले आहे. तर कंपनी |

| | | |
|---|---|---|
| | आहे. ती पडीक जमीन,गायरान, त्यात थुतरा ग्रामपंचायतीची ३६ गुंठे जागा आहे. ती ग्रामपंचायतीची स्मशानभूमीची जागा आहे. ती आता माईन्सच्या मध्यभागी आहे. ती आता ग्रामपंचायतीच्या उपयोगाची नाही. या गायरान जमिनी, गावठाण त्याचे सर्व्हे नंबर उपलब्ध आहेत, त्याचे निरिक्षण, परिक्षण करुन त्या बदल्यात शासकीय कामासाठी भौगोलिक विकासाकरिता कोणत्याही गावाजवळची जमिन देण्यात यावी. स.न. २४२/१, ९८ आर, स.न. ११५/१ २१.५ आर, स.न.१३५ २.८४ आर आणि २३८/२ द.द ८ आर अशी जमिन आहे. तरी याची नोंद घेण्यात येऊन ग्रामपंचायतीस कळवावे.<br>तसेच बऱ्याच स्थानिकांच्या जमिनी माईन्सच्या मध्ये आहेत. तर त्याबाबत कंपनीने लक्ष ठेवावे. | प्रशासन याबाबत संपूर्ण पाहणी करेल व लोकहिताचा निर्णय घेईल. |
| ६) | त्यांनी पुढे सांगितले की येथे जे सुशिक्षित बेकार आहेत, ज्यांनी अंबुजा आयटीआयमध्ये शिक्षण घेतलेले आहे, त्यांच्या शैक्षणिक अहर्तेनुसार त्यांना कंपनीत प्राधान्य देण्यात यावे. लोकांपेक्षा स्थानिकांनाच प्राधान्य देण्यात यावे. | सूचनेची नोंद घेण्यात आली. |
| ७) | आरोग्याविषयी बऱ्याच जणांनी सूचना केलेल्या आहेत. अंबुजाचे क्लिनिक १०-१२ गावांमध्ये चालू आहे. आनंदाची गोष्ट आहे की अर्धा पैशात औषधे मिळतात. दर आठवड्याला डॉक्टर येऊन तपासणी करतात. या गोष्टी अभिनंदनीय आहेत. परंतु एखाद्या गरीब कुटुंबात जीवघेणे आजार होतात, ऐपतीच्या पलिकडे पैसे लावणे शक्य नसते, अशा कुटुंबियांना कंपनीमार्फत आर्थिक मदत मिळावी अशी विनंती करण्यात येते. | सूचनेची नोंद घेण्यात आली. |
| ८) | बैठकीत गडचांदुरच्या बसस्टॉपच्या जागेबाबत चर्चा झालेली आहे. तर त्याबाबत तोडगा लवकरात लवकर काढण्यात याव्यात. | सूचनेची नोंद घेण्यात आली. |

१८) **श्रीमती जीजाबाई बल्की, माजी सरपंच, उप्परवाही, ता. कोरपना, जि. चंद्रपूर:-**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | आतापर्यंत ज्या काही सुविधा बारा गावांना मिळाल्या, त्या लोकांनी येथे कथित केलेल्या आहेत. पण माझी एक विनंती आहे की बारा गावच्या जमिनी घेतल्यानंतर ना हरकत प्रमाणपत्र देऊन कोर्टात ज्या केसेस टाकल्या आहेत, त्या केसेस आतापर्यंत २३ वर्षे झाली, त्याचा निकाल लागलेला नाही. तरी माझी जिल्हाधिका-यांना विनंती आहे की आज २३ वर्ष होऊन गेले, याच्यातील अर्धे लोक मृत्युमुखी पडले, तर जे लोक राहिलेले आहेत, तर ही निकाल आपण कधि देणार? अंबुजा कंपनीने हा निकाल देणे अपेक्षित होते आणि जिल्हाधिकारी यांनी दखल घेणे आवश्यक होते, कारण जिल्हाधिकारी यांनीच आमच्या जमिनी घेतलेल्या आहेत. तर कोर्टातील सुनावणी का रेंगाळत आहे? आम्हांला पाहिजे असलेल्या मोबदल्यासाठी आम्ही कोर्टात केसेस टाकल्या आहेत, तो आम्हांला देण्यात यावा. मे महिन्यात याचा निकाल लावावा अशी मी अंबुजा व जिल्हाधिकारी यांना विनंती करते नाहीतर बारा गावाच्या सर्व महिला जमा करुन गेट बंद केल्याशिवाय राहणार नाही. एक महिन्याची मुदत देत आहे. जून महिन्यात त्या महिलांना घेऊन मी येणार आहे.<br>माझी जिल्हाधिकारी यांना विनंती आहे की याबाबत आपण तोडगा लवकरात लवकर काढावा. | सूचनेची नोंद घेण्यात आली. |
| २) | दुसरी गोष्ट अंबुजा कंपनीस विचारायचे आहे की २०२०-२१, २०२१-२२ या वर्षांमध्ये पाऊस पडला, यांनी नाली काढली. ती नाली १-१ १/२ माणूस खोल होती. त्या नालीचे पाणी पूर्णपणे शेतात झिरपले. त्यामुळे तेथील शेतकऱ्यांचा कवडीचा माल पिकलेला नाही. तो वंचित राहिला. आम्ही | प्रकल्प प्रवर्तकांनी यांनी सांगितले की आपण नालीचे पाणी शेतात आल्याचे येथे सांगितले. तर आपणही सांगितले आहे की आम्ही नाली भरली आहे. आपले जे नुकसान झालेले आहे, त्यासाठी कंपनीची एक समिती (टीम) पाहणी करण्यास पाठविण्यात येईल. आपले जे |

| | | |
|---|---|---|
| | वारंवार यांना निवेदन दिले. त्यांनी येऊन शेती पाहिली. आम्ही त्यांना दोन वर्षांचा मोबदला मागितला, नाही तर नाली बुजवा. यांनी आम्हांला न विचारता व मोबदला न देता नाली बुजविली. तर यांनी मोबदला का नाही दिला. याचे उत्तर बैठकीत देण्यात यावे. माझ्या शेताबरोबरच ६-७ शेतकरी आहेत, आम्ही २-३ वेळा निवेदन देऊनही यांनी मोबदला दिलेला नाही. तर आताचेआता मोबदल्याचे चेक देण्यात यावेत. | नुकसान झाले, त्याची भरपाई करण्याचा प्रयत्न करण्यात येईल.<br>यावेळी श्रीमती बल्की यांनी मागणी केली की दोन वर्षांची भरपाई देणे आवश्यक आहे. आपण जे चांगले काम केले, त्याबद्दल धन्यवाद. आपण बारा गावात चांगले काम केलेले आहे.<br>प्रकल्पाचे कार्यकारी संचालक यांनी सांगितले की येथेही चांगलेच काम करण्यात येईल. कंपनीची टीम आपल्या शेताची पाहणी करेल व आपणास नुकसान भरपाई मिळेल. |
| ३) | तरी गेले २०-२२ वर्ष प्रलंबित असलेले काम या महिन्यात झाले पाहिजे. नाहीतर सर्व महिला एकत्र येऊन गेट रोखल्याशिवाय राहणार नाही. सर्व बारा गावाच्या सरपंचांना विनंती आहे की त्यांनी महिलांना पाठिंबा देऊन यांना गेटमध्ये पाऊल टाकून द्यायचे नाही. ना हरकत प्रमाणपत्र द्यायचे नाही. कारण कंपनीची लीझ ही २०-२२ वर्षांचीच होती. यांना लिझ वाढवून द्यायची नाही. मी बारा गावाच्या लोकांना हात जोडून विनंती करण्यात येते की या प्रकल्पास ना हरकत प्रमाणपत्र देऊ नका. जिल्हाधिकारी यांनी याची नोंद घ्यावी. | त्यांनी सांगितले की न्यायालयात ज्या गोष्टी प्रलंबित आहेत, त्याबाबत आम्ही कुठलेच आश्वासन देऊ शकत नाही. |

## १९) <u>श्री वैभव बदखल, राहणार-उप्परवाही, तालुका-कोपना, जिल्हा-चंद्रपूर:-</u>

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | येथे उद्योग होतो आहे ही आनंदाची बाब आहे. त्याचप्रमाणे कंपनीने स्थानिकांना रोजगाराची संधी देण्याबाबतही बघितले पाहिजे. बैठकीत अशा तक्रारी करण्यात आल्या की स्थानिकांना डावलून परप्रांतीयांना नोकरीची संधी देण्यात येते. तर स्थानिक कंपनीतील कामास सक्षम नाहीत का? येथील आयटीआयमधील यशस्वी होणारे बरेच | सूचनेची नोंद घेण्यात आली. |

| | | |
|---|---|---|
| | स्थानिक मुले आहेत. ते जर सक्षम असतील, तर स्थानिकांना नोकरीत प्राधान्य देण्यात यावे. | |
| २) | त्यांनी सांगितले की प्रकल्पाला लागूनच आमची शेती आहे. ब्लास्टींगमुळे जे मायनिंग पिट्स आहेत, ते पंप करुन दुसऱ्या पीट्समध्ये कंपनी पाणी एकत्रित करतात. आम्ही बोअरवेल शेताला पाणी देण्यासाठी वापरतो. बोअरवेलचे पाणी खूपच कमी झालेले आहे. पाण्याची पातळी कमी झाली का ब्लास्टींगमुळे पाणी कमी झाले हे कळत नाही. याबाबत आपण पुढील कार्यवाही करावी. | प्रकल्प प्रवर्तकांनी यांनी माहिती दिली की आपण बोअरच्या पाण्याची पातळी कमी झाल्याची तक्रार करत आहात. तर पाण्याची पातळी ही ब्लास्टींगमुळे कमी होत नाही. किंबहुना आमचे म्हणणे आहे की माईन्समध्ये पाणी साठत असल्याने पाण्याची पातळी ही वाढते. तरी आमच्या माईन्स विभागाला आपल्या शेताची पाहणी करण्यास त्वरित पाठविण्यात येईल व त्याबाबत उपाययोजना करण्यात येतील. |
| ३) | त्यांनी पुढे सूचना केली की वरिल माती जी टाकण्यात येते, तेथे खुरटी गवत वाढत आहे. त्यामुळे तेथे वन्यजीव व इतर प्राणी येऊन ते आमच्या पीकांची नासाडी करत आहेत. तरी माझी मागणी आहे की आमच्या शेताला चेन लिंक्ड कंपाऊंड घालण्यात यावे. | आपणास फेन्सिंग करुन देण्यात येईल |
| ४) | त्यांनी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास प्रश्न विचारला की आमच्या शेतात डस्टचे प्रदूषण होत आहे. सर्व डस्ट आमच्या शेतातील पीकांवर पडून पीकांची नासाडी होत आहे. आम्ही वेळोवेळी कंपनी कडे व आपल्या कार्यालयात तक्रार केलेली आहे. तर आपण त्याबाबत पुढील काय कारवाई केली हे कळविलेले नाही. तरी याबाबत काय कारवाई करण्यात आली याची माहिती बैठकीत देण्यात यावी. | आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी श्री वैभव बदखल यांना स्थानीक चंद्रपूर कार्यालयात भेटण्याची सूचना केली. त्यांनी सर्व कार्यवाहीची माहिती देण्यात येईल असे आश्वासन दिले. |

वैभव यांनी कौशल्यावर आधारित रोजगाराच्या संधी स्थानिकांना देण्याची मागणी केली.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना फक्त पर्यावरणविषयक सूचना,प्रश्न विचारण्याचे आवाहन केले.

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| ५) | स.न.७/२ आणि स.न. १ अशा दोन ठिकाणी गायरान जमिनी होत्या. गायरान जमिन कंपनीने आपल्या ताब्यात घेतल्या. गावात घरासाठी जागा नाही. एका कुटुंबाची चार कुटुंबे झालेली आहेत. स.न.१ ही जागा आदिवासी होस्टेलला दिलेली आहे. तर स.न.७/२ ही जागा शिल्लक आहे. उच्च न्यायालय, मुंबई यांच्या निर्णयानुसार शेतकरी २० वर्षे वा ३० वर्षे राहो, तुम्ही त्यांना भूखंडातून उठवत असाल तर तहसीलदारने ती जागा शेतकऱ्यांना देण्यात यावी. तर स.न. ७/२ ही सरकारी जमिन गावठाणासाठी कंपनीने द्यावा अशी मी विनंती करत आहोत. | सूचनेची नोंद घेण्यात आली. |

२०) **श्री अनिल डांगे, ग्रामपंचायत सदस्य, थुटरा, तालुका-राजूरा, जिल्हा-चंद्रपूर:-**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | १९९९ साली या बारा गावच्या लोकांनी अंबुजा सिमेंटला ना हरकत प्रमाणपत्र दिले. आज २३-२४ वर्षे झाली. टुथरा गावाचा रस्ता दुरुस्त केलेला नाही. आता लीज संपली म्हणून ती वाढवून पाहिजे व डपिंगसाठी जागा पाहिजे म्हणून ही बैठक बोलावली आहे. कारण स्थानिकांनी परत कंपनीचा डस्ट खावा म्हणून ही बैठक बोलावली आहे. किती वर्षे आम्ही वंचित राहावे, उपाशी राहावे. दत्तक म्हणजे लहानपणापासून मुलाचे संगोपन त्याचे लग्न होईपर्यंत केले जाते, त्यास दत्तक म्हणतात. आपण गेले २५ वर्षे बराच वेळा जिल्हाधिकारी यांच्याशी चर्चा केली असेल. पण आमचा एकही प्रश्न हा जिल्हाधिकारी यांच्यापर्यत नेलेला नाही. येथील जवळ गावे डुंगेला, गोपाळपूर | सूचनेची नोंद घेण्यात आली.<br>प्रकल्प अधिकारी यांनी उत्तर दिले की दत्तक हा शब्द कसा आला हे माहिती नाही. तर कंपनीने दत्तक घेतले म्हणजे त्यांच्या सीएसआर निधीतून जी सामाजिक दायित्व त्या विशिष्ट गावाचे करायचे आहे असा आहे. दत्तक शब्दाऐवजी सामाजिक दायित्व हा शब्द वापरावा असे आमचे म्हणणे आहे.<br>प्रकल्प अधिकारी यांनी सांगितले की थुत्रा ग्रामपंचायतीने ज्याज्या वेळी मागणी केली, त्या त्या वेळेस जेवढया शक्य आहेत, तेवढ्या मागण्या पूर्ण करण्यात आल्या आहेत.<br>प्रकल्प अधिकारी यांनी सांगितले की नुकताच थुतरा गावाचा ठराव प्राप्त झालेला आहे. |

| | | |
|---|---|---|
| | ही आहेत. तेथील व्यक्ती जर मरण पावली, तर त्याच्या अंत्यसंस्कारासाठी परिसरातील गावात जागा नाही. अंबुजाकडे एवढी जागा असताना गावातील व्यक्तीच्या अंत्यसंस्कारासाठी जागा दिलेली नाही. दत्तक घेतलेल्या गावातील माणूस गरिबीने दवाखान्यात जाऊ शकत नाही याची जाणीवसुध्दा प्रकल्प व्यवस्थापनास नाही. ज्यांनी जमिनी दिल्या, त्यांनाच कंत्राटी म्हणून गेले २० वर्षे काम करावे लागत आहे, ही लाजीरवाणी गोष्ट आहे. जर दत्तक घेतलेल्या बारा गावातील जमिन घेता, तर तेथील तरुण-तरुणींना नोकरी देण्याचे तुमचे कर्तव्यच आहे. मात्र कंपनी प्रशासनाने हा विचार केला नाही. कार्यक्रम करतात व जातात. आत बैठकीत मी लिहून आणले आहे, येथील लोकांच्या ३९ समस्या आहेत. कंपनी प्रशासन फक्त कागदावर काय सुविधा देणार ते लिहितात व जिल्हाधिकारी यांना पाठवितात. पण प्रत्यक्ष सुविधा पुरविलेली नाही. | तेथील दोन्हा गावच्या संरपंचांना - गोपाळपूर व ढुमने ले आऊट यांना ठरावातील मंजूर करण्यात आलेली कामे पूर्ण करण्याचे आश्वासन देण्यात आलेले आहे. |
| २) | कंपनी ना हरकत प्रमाणपत्रासाठी जनतेकडे येते,तर आम्हीही आता विचारपूर्वकच एनओसी प्रदान करु. कारण तुम्ही कंपनीचा माल खाता, आम्ही डस्ट खातो. | सूचनेची नोंद घेण्यात आली. |

## २१) <u>श्री संजय मुसळे, माजी सभापती, तालुका-कोरपना, जिल्हा-चंद्रपूरः-</u>

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | अनेकांनी स्थानिक बेरोजगारीचा प्रश्न मांडला आहे. आताच प्रकल्प अधिकारी यांनी दत्तक हा शब्दप्रयोग करु नये असे सांगितले. पण कंपनीनेच दत्तक गावे असे म्हटल्याने सर्वांनी तसा शब्दप्रयोग केला. येथे स्थानिकांनी त्यांचे प्रश्न मांडले. कंपनीसाठी वीस वर्षापूर्वी जमिनी दिल्या, पण गेले २०-२१ वर्षे काहींना कंत्राटी पध्दतीवर काम करावे लागते, तर काहींना अजूनही नोकरीची प्रतिक्षा | सूचनेची नोंद घेण्यात आली. |

| | | |
|---|---|---|
| | आहे. त्यांनी दुसरी मागणी केली की दत्तक गावातील तरुण-तरुणांना वर्तमान व भविष्यात होणाऱ्या रोजगाराच्या संधीत प्राधान्य देण्यात यावे. तसा महाराष्ट्र शासनाचा आदेशच आहे. या भागात आयटीआय, पदवीधर, उच्च शिक्षित, एम.बी.ए.झालेले बरेच तरुण-तरुणी असताना त्यांना रोजगाराची संधी देण्यात येत नाही, मात्र बाहेरच्या लोकांना रोजगार दिला जातो, हे खेदाची गोष्ट आहे. मा. जिल्हाधिकारी यांना विनंती आहे की त्यांनी याची दखल घ्यावी व स्थानिकांना रोजगार देण्याच्या सूचना द्याव्यात. | |
| २) | दुसरी गोष्ट म्हणजे मी या कंपनीचा कर्मचारी होतो. या भागात सिमेंट कंपन्या आहेत. तर कंपनीने किती झाडे लावली व कोणत्या प्रजातीची झाडे लावली याची चौकशी शासनाच्या अधिकृत्त विभागाकडून करण्यात यावी. म्हणजे सत्य काय आहे हे लक्षात येईल. माझी जिल्हाधिकारी यांना विनंती आहे की येथील व्यक्तीची जमिन अधिग्रहित करण्यात येते,त्यास नोकरी दिली की ५८ व्या वर्षी तो सेवानिवृत्त होतो, म्हणजे त्याची नोकरी जाते व जमिनही जाते. तरी माझी विनंती आहे की तो प्रकल्पग्रस्त कर्मचा-याच्या वारसालाही त्याच्या योग्यतेनुसार नोकरी देण्यात यावी ही विनंती. | सूचनेची नोंद घेण्यात आली. |

## २२) श्री गौतम भुसारकर, अध्यक्ष, पंचायत समिती, हरदोना,

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | बैठकीत जे प्रश्न, सूचना मांडण्यात आल्या, त्यातून शासनास एक सूचना द्यावीशी वाटते व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास विनंती करावयाची आहे की येथील शेतकऱ्यांची जमिन अधिग्रहित करण्यात आलेली आहे. त्यावर कित्येक कोटी रुपये कंपनीने मिळविलेले आहेत. पण ज्याची | सूचनेची नोंद घेण्यात आली. |

| | | |
|---|---|---|
| | जमिन गेली, ते भिकारी झाले. त्यांच्या मुलांना खायला काहीही नाही. कारण पैसा मिळाल्यावर हे लोक दारू पितात व सर्व पैसा खर्च करतात, आता तर ते भिकारी झालेले आहेत. तरी माझे सरकारला सांगणे आहे की सरकारने कायदे बनवावेत. प्रकल्पग्रस्तांच्या तीन-चार पिढ्यांना नोकरीचे आरक्षण हवे. कारण त्यांचे जीवन जगण्याचे साधनच नष्ट झालेले आहे | |
| २) | दुसरा मुद्दा म्हणजे प्रकल्पग्रस्तांना प्रकल्पात ८०% रोजगारीची संधी ही देण्यात यावी. स्थानिकांना डावलून बाहेरील व परप्रांतीयांना संधी देण्यात येते. ह्याला विकास म्हणता येत नाही.<br>त्यांनी सांगितले की प्रकल्पग्रस्तांना नोकरीची संधी देण्यासाठी एक समिती नेमण्यात यावी, त्यात त्या त्या गावांचे सरपंच असावेत. | सूचनेची नोंद घेण्यात आली |
| ३) | पुढील मुद्दा आहे की येथील इतर कंपन्यापेक्षा अंबुजा ही कंपनी चांगले काम करते. स्थानिकांमध्ये जे उच्च शिक्षित आहेत, व ज्यांच्याकडे कौशल्य आहे, त्यांना रोजगाराची संधी देण्यात यावी.<br>आपल्या कंपनीत असे होत नाही. म्हणून एक समिती नेमावी. ती समिती मग बघेल की कोणत्या व्यक्तीस संधी देण्यात आली नाही. पुढील मुद्दा अंबुजा सिमेंटमध्ये आमच्या गावातील लोकांच्या जमिनी गेल्या, पण एकाही व्यक्तील कायमस्वरुपी नोकरी नाही. काहीजण कंत्राटदारीत आहेत. | सूचनेची नोंद घेण्यात आली |
| ४) | त्यांनी पुढे सांगितले की हरदोना गावात रस्त्याची अवस्था अत्यंत गंभीर आहे. तरी रस्ता व पूल बनवून द्यावा. गडचांदूरला लागूनच माईन्स आहे. येथे बसस्टॅण्ड नाही. तरी अबुंजा सिमेंटने एक एकर जमिन बसस्टॅण्डसाठी द्यावी. येथे माणिकगड किल्ला आहे. त्यास या कंपनीच्या प्रदूषणामुळे हानी पोचू नये. गडचांदुरला लागून एक बुध्द भूमी आहे. त्याबाबत लक्ष घालावे. | सूचनेची नोंद घेण्यात आली |

| | | |
|---|---|---|
| | हे सर्व वाजवी व कायदेशीर मुद्दे आहेत. तरी या सर्वांचा विचार करावा व जनतेला न्याय द्यावा ही विनंती. | |

२३) **<u>श्री सचिन पिंपळशेंडे, राहणार-लखमापूर, जिल्हा - चंद्रपूर.</u>**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | प्रकल्पग्रस्तांना नोकरीचा हक्क असताना त्यांना वंचित ठेवण्यात आलेले आहे. आम्ही वेळोवेळी आंदोलने केली. कित्येक बैठका जिल्हाधिकारी कार्यालयात झाल्या. नंतर मा. जिल्हाधिकारी यांनी चौकशी समिती नेमली. समितीने असा निष्कर्ष काढला की प्रकल्पग्रस्तांना नौकऱ्या दिल्या नाहीत, वेळोवेळी जिल्हाधिकारी कार्यालयास दिशाभूल करणारी व चुकीची माहिती कळविली. अशाप्रकारे कंपनीने कराराचे उल्लंघन केलेले आहे. असा जिल्हाधिकारी कार्यालयाचा अहवाल आहे. अहवालात स्पष्ट नमुद केलेले आहे की दिनांक १३/०८/१९९९ रोजी झालेल्या करारातील मुद्दा क्रं. ८ अ व ८ ब चा भंग केला असल्याने कंपनीविरोधात मुद्दा क्रं. १० अ नुसार योग्य ती कार्यवाही करण्यास अहवाल सादर करण्यात येत आहे. | सूचनेची नोंद घेण्यात आली. |
| २) | आता आमची विनंती आहे की कंपनीचा भूसंपादन करार रद्द करण्याची कार्यावाही अंतिम स्तरावर चालू आहे. तर चुकीचा व नियम डावलून काम करणा-या कंपनीस ना हरकत प्रमाणपत्र कोणत्या आधाराने द्यावी याची आपण कृपया नोंद घ्यावी. | सूचनेची नोंद घेण्यात आली |

२४) **श्री आबाजी बोबडे, उपसरपंच, पिंपळगाव, जिल्हा- चंद्रपूरः-**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | अंबुजा सिमेंटला धन्यवाद. कारण पायाभूत सुविधा शिक्षण, आरोग्य, माझ्या गावाशी निगडीत असो, अंबुजा फाऊन्डेशनतर्फे आम्हांला बऱ्याच प्रमाणात मदत करण्यात आली. माझा एक वेगळा प्रश्न आहे. मी पिंपळगावचा रहिवाशी आहे. माझा प्रश्न हा पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समितीस आहे. माझ्या गावाच्या शेजारी अल्ट्रा टेक सिमेंट कंपनी आहे. त्या कंपनीची नविन माईन्स आमच्या शिवारातील उत्तर आणि पूर्व कोप-यात असलेल्या शेतीपासून अवघ्या गावाच्या अंतरापासून १ १/२ कि.मी. अंतरावर आहे. या परिसरात शेतकऱ्यांनी, कष्टकऱ्यांनी बोअरवेल, विहीरी, या सुविधा करुन आपल्या शेतीसाठी केलेल्या आहेत. परंतु माईन्स झाली तेव्हापासून या परिसरातील माईन्सची खोलीही बोअर आणि विहीर यांच्या खोलीपेक्षा जास्त झालेली आहे. त्या परिसरातील शेतीला उपयोगी असणारे बोअर, विहीर यांचा जलप्रवाह कमी झालेला आहे. | सूचनेची नोंद घेण्यात आली. |
| २) | तरी माझी विनंती आहे की माझ्या गावक-यांतर्फे जरी मी माझे म्हणणे लेखी देऊ शकलो नाही तरी वरिष्ठांना कळवावे, याची नोंद घ्यावी, संबंधित व्यवस्थापनास कळवावे. यानंतर मी माझा पुढील पत्रव्यवहार करेन ही आपण नोंद घ्यावी ही विनंती. | सूचनेची नोंद घेण्यात आली |

२५) **श्री प्रविण मटाले. जिल्हा- चंद्रपूरः-**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | जसे माझे मित्र श्री सचिन पिंपळशेटे यांनी प्रश्न उपस्थित केला की कंपनीने वेळोवेळी शासनाची दिशाभूल केली, चुकीची माहिती दिली, त्यामुळे | अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की तुम्हांला चुकीची माहिती सांगण्यात आलेली आहे. येथे कुठलेही |

| | | |
|---|---|---|
| | करारातील मुद्दा क्रं. ८ अ व ८ ब चा भंग केला असल्याने कायदेशीर कारवाई ही मंत्रालय स्तरावर चालू आहे. आजची बैठक आहे, ती सामाजिक दायित्व अंतर्गत विकास कामी मंजूरी देण्यासाठी आहे. तर माझा एक प्रश्न आहे की शासन स्तरावर कारवाई करण्याची प्रक्रिया चालू असताना कंपनीस ना हरकत प्रमाणपत्र दिले तर हे कायद्याचे उल्लंघन नाही आहे काय? | ना हरकत प्रमाणपत्र देण्यात येणार नाही. या जनसुनावणीचा उद्देश हा आहे की स्थानीक उपस्थितांचे प्रस्तावित प्रकल्पाविषयी जे पर्यावरणीय प्रश्न, सूचना किंवा आक्षेप असल्यास ते नोंदविणे, बैठकीचे इतिवृत्त तयार करणे व शासनास सादर करणे हा आहे. |
| २) | श्री मटाले यांनी मागणी केली की उद्या होणाऱ्या जनसुनावणीत प्रकल्प प्रवर्तकांनी किती प्रकल्पग्रस्तांना प्रकल्पात नौकऱ्या मग त्या कायमस्वरुपी/कंत्राटी दिल्या याची सर्व यादी व ज्या ज्या गावात सीएसआर निधी खर्च केला, तेथील विविध विकासकामांची माहिती देण्याची व्यवस्था करावी. प्रकल्प प्रवर्तकांना २% सीएसआर निधी खर्च करणे बंधनकारक असताना त्यांनी केलेल्या खर्चाच्या मानाने कामे खूपच तुटपुंजी वाटतात. त्यामानाने कामे झालेली वाटत नाहीत. कंपनी व्यवस्थापनातर्फ उत्तर द्यावे ही त्यांनी सूचना केली. | प्रकल्पाचे कार्यकारी संचालक यांनी सांगितले की बैठकीत सर्वजण व्यस्त असल्याने उद्या जमले तर निश्चितच दाखविता येतील.<br>सीएसआर बाबत उत्तर देताना प्रकल्पाचे कार्यकारी संचालक यांनी सांगितले की जी जी माहिती दरवर्षी जिल्हाधिकारी कार्यालय, शासन, केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्याकडून मागण्यात येते,ती वेळोवेळी उपलब्ध करुन देण्यात येते. |

**२६) <u>श्री तुषार. पिंपळगाव, जिल्हा- चंद्रपूरः-</u>**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | कंपनीचे काम २००२ ला सुरु झाले, २००६ ला जिल्हाधिकारी कार्यालयात आमची १२ गावच्या लोकांची सभा होती. त्यावेळी जिल्हाधिकारी यांनी सांगितले की दत्तक नाही, तर बारा गावातही चांगले काम झाले पाहिजे. नाहीतर कळवावे, आता बारा गावातही चांगले काम सुरु असल्याने कोणीही अहवाल देण्यास तयार नाही. जिल्हाधिकारी कार्यालयात अजूनतरी कंपनी काम करत नाही, म्हणून अहवाल गेलेला नाही. त्यावेळी काही लहान मुले होती. आमच्या गावात त्यावेळी | सूचनेची नोंद घेण्यात आली. |

| | | |
|---|---|---|
| | दोन लहान मुले होती. आता ती मोठी झाली असून त्यांना कंपनीने समावेश करुन घ्यावे. परिसरात इतर कंपन्या आहेत. त्यामध्ये अंबुजा कंपनी ही चांगले काम करत आहे. कंपनी आहे,म्हणून अंबुजा फाऊन्डेशन आहे. म्हणून आम्ही आहोत. आम्ही आपला गांव हा आदर्श करु शकतो. चंद्रपूर जिल्यात आमची शाळा पहिली आहे. हे सर्व अंबुजामुळे झालेले आहे. तरी अंबुजा सिमेंटला जेवढे धन्यवाद द्यावे, तेवढे कमी आहे. | |

२७) **श्री शंकर बाबूराव आत्राम, सरपंच**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | जसे कंपनीचे सामाजिक उत्तरदायित्व आहे, तसेच ग्रामपंचायतीचे आहे. दरवर्षी अंबुजाकडून झाडे येतात. आपली पण जबाबदारी आहे झाडे वाढविण्याची. आमच्या गावात झाडे आहेत. आमच्या स्मशानभूमीत झाडे लावलेली आहेत. मांगीमध्ये जा, तेथे ऑक्सिजन पार्क आहे. सामाजिक जबाबदारी म्हणून आमच्या गावाने वीस लाख रुपये गोळा केले. अंबुजा फाऊन्डेशनने त्यात तीस लाख रुपये सहभाग रक्कम म्हणून दिले. आता ती करुन घ्यायची जबाबदारी आपली आहे. याठिकाणी आपण कमी पडत आहोत, तर आपण सक्षम होणे आवश्यक आहे.<br>श्री आत्राम यांनी पुढे सांगितले की आमच्या गावातील अपंगांना आम्ही दहा हजार दिले. अंबुजा यांना सांगितले की त्यांना बकऱ्या देण्यात याव्यात. आमच्या दहा हजार रुपयात सहभाग म्हणून अंबुजाने तीस हजार बकऱ्या दिल्या. आता अपंगांना आर्थिक उत्पन्न झाले. त्याप्रमाणे सामाजिक दायित्व पार पडत आहे. | सूचनेची नोंद घेण्यात आली. |

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी काही सूचना, आक्षेप असल्यास त्या उपस्थित करण्याची विनंती केली. उपस्थितांकडून कोणताच प्रतिसाद नव्हता.

बैठकीचा समारोप करताना अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांनी प्रस्तावित प्रकल्पाविषयी सूचना, आक्षेप नोंदविल्याबद्दल स्थानिकांचे व त्याचप्रमाणे सर्वांचे आभार मानले व जनसुनावणी संपन्न झाल्याचे घोषित केले.

मा. अध्यक्षांचे आभार मानून जनसुनावणी ही संस्थगित करण्यात आली.

प्राप्त सूचना, आक्षेप २४ सोबत जोडले आहेत.

| | | |
|---|---|---|
| **(उमाशंकर भादुले)** | **(अ. मा. करे)** | **(विशालकुमार मेश्राम)** |
| समन्वयक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती तथा उप-प्रादेशिक अधिकारी, म. प्र. नि. मंडळ, चंद्रपूर | सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती तथा प्रादेशिक अधिकारी, म. प्र. नि. मंडळ, चंद्रपूर | अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती तथा अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, चंद्रपूर |